# महापशुधन वार्ता

महाराष्ट्र शासन
पशुसंवर्धन विभाग
पशुधन हिताय: बहुजन सुखाय:

वर्ष १ ले, अंक २ रा, प्रकाशक: पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य

जून-२०२५



महाराष्ट्र शासन
पशुसंवर्धन आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११०६७

डिजीटल ई-मासिक

# महापशुधन वार्ता

वर्ष १ ले, अंक २ रा

जून-२०२५

संपादक
**डॉ. प्रशांत भड**
उपआयुक्त पशुसंवर्धन
(पशुधन व कुक्कुट)
पशुसंवर्धन आयुक्तालय,औंध, पुणे-६७

पशुसंवर्धन विभाग
टोल फ्री क्रमांक :
१८००-२३३-०४१८
राज्यस्तरीय कॉल सेंटर
संपर्क क्र : १९६२

पत्रव्यवहारासाठी पत्ता :
पशुसंवर्धन आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य,
औंध, पुणे - ४११००७

महापशुधन वार्ता

क्यू आर कोड स्कॅन करा व अंक मिळवा

या अंकात व्यक्त करण्यात आलेल्या मतांशी तसेच लेखांशी संपादक व पशुसंवर्धन विभाग सहमत असेलच, असे नाही
( पुणे न्यायकक्षेत ).

सत्यमेव जयते



**डॉ. प्रवीणकुमार देवरे** (भा.प्र.से.)
आयुक्त पशुसंवर्धन , महाराष्ट्र राज्य, पुणे-६७

## !! शुभसंदेश !!

**'महापशुधन वार्ता'** या डिजीटल ई-मासिकाच्या पहिल्या अंकाचे प्रकाशन पशुसंवर्धन मंत्री ना. श्रीमती पंकजा मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले. पशुपालकांना पशुसंवर्धनाचा व्यवसाय करताना आवश्यक तांत्रिक ज्ञान, पशुसंवर्धन विभागातील योजना, उपक्रम, संशोधन, प्रशिक्षण यासह विभागातील घटना व घडमोडींची अद्यावत माहिती विनासायास उपलब्ध व्हावी, या उद्देशाने डिजीटल स्वरुपात प्रकाशित करण्यात येत असलेल्या या अंकाचे पशुपालक व शेतकरी बांधवांकडून उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले, याबद्दल संतोष वाटतो.

**'महापशुधन वार्ता'** या डिजीटल ई-मासिकाचा दुसरा अंक पशुपालक-शेतकरी वाचकांच्या हाती सोपविताना आनंद होत आहे. विभागाचा हा उपक्रम म्हणजे पशुपालक बांधवांशी संवाद साधण्याचे एक सशक्त माध्यम आहे. या माध्यमातून पशुपालकांना आवश्यक तांत्रिक ज्ञान उपलब्ध करुन देण्यासाठी पशुसंवर्धनशील विभाग प्रयत्नशील आहे. विभागाने गत महिन्यात राष्ट्रीय कृषि विकास योजनेतंर्गत, बीएसएल-३ व बीएसएल-२ प्रयोगशाळा, राष्ट्रीय संदर्भिय लस चाचणी गुणनियंत्रण प्रयोगशाळा व सुपर स्पेशालिटी व्हेटरनरी हॉस्पिटल, औंध या संस्थांचे उद्घाटन करुन पशुपालकांसाठी आवश्यक सेवा व सुविधा अधिक सक्षम करण्याकडे निर्णायक पाऊल टाकले आहे. यापुढील काळातही पशुपालकांना सहाय्यक व मार्गदर्शक ठरतील असे उपक्रम राबविण्यासाठी पशुसंवर्धन विभाग प्रयत्नशील आहे.

**'महापशुधन वार्ता'** या डिजीटल ई-मासिकाच्या दुसऱ्या अंकास माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा!

**(डॉ. प्रवीणकुमार देवरे)**

## या अंकात...


- समुपदेशनाद्वारे बदल्यांचा निर्णय ऐतिहासिक: **ना. पंकजा मुंडे**
- **महापशुधन वार्ता** ई - डिजीटल मासिकाचे प्रकाशन
- पशुसंवर्धनाच्या व्यवसायाला 'कृषी'चा दर्जा देण्यासाठी प्रयत्नशील : **उपमुख्यमंत्री ना. अजित पवार यांचे प्रतिपादन**
- औंध येथील सुपर स्पेशालिटी व्हेटरनरी हॉस्पिटलचे उद्घाटन
- भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी राज्यस्तरिय पशु रोग अन्वेषण प्रयोगशाळा पुणे,या संस्थेस केंद्र शासनाद्वारे अर्थसहाय्य करणेकरीता **सामंजस्य करार**
- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त पशुसंवर्धन विभागामार्फत विविध कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन
- **१०० दिवसांचा सुधारणा कार्यक्रम:** पशुसंवर्धन विभागातील विभागीय व तालुकास्तरीय कार्यालयांची गौरवपुर्ण कामगिरी
- **१३३ वा पशुसंवर्धन दिन:** नवी आशा नवी दिशा
- विजांपासून पशुधनाचे रक्षण करण्यासाठी घ्यावयाची काळजी
- भ्रुण प्रत्यारोपण तंत्रज्ञान
- **ब्रुसेल्लोसीस प्रतिबंध:** लसीकरण हाच खरा राजमार्ग
- क्लोरॅन्ट्रानीलीप्रोलची जनावरांमधील विषबाधा
- पशुसंवर्धन गीत
- श्वेतक्रांतीची किमया भारी, आर्थिक संपन्नता पशुपालकांच्या दारी
- सुरभी चयन श्रृंखला
- प्राणी क्लेष प्रतिबंधक कायदा १९६०
- **शिवार गप्पा :** गोष्ट गुरांमधल्या विषबाधेची



# समुपदेशनाद्वारे बदल्यांचा निर्णय ऐतिहासिक: ना. पंकजा मुंडे

## पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांमध्ये समाधान, सेवांचा दर्जा व व्याप्ती वाढविण्याचे आवाहन

**पशुसंवर्धन आयुक्तालय, औंध, पुणे-४११०६७**

**पुणे**: राज्यामध्ये पशुसंवर्धनविषयक सेवांचा दर्जा व व्याप्ती वाढविण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने धोरणात्मक निर्णयांची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यास सुरुवात केली आहे. विभागाच्या शतकोत्तर वाटचालीत अनेक अभिनव उपक्रमांच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्य पशुजन्य उत्पादनांत वाढ करुन देशात अग्रेसर करण्याचा मानस आहे. त्यासाठी उपलब्ध मनुष्यबळाचा नियोजनपूर्वक वापर करुन प्रभावी लोकसेवा व अभिनव बदलांच्या माध्यमातून पशुसंवर्धनाच्या व्यवसायाला चालना देण्याकरिता पशुसंवर्धन विभाग सज्ज झाला आहे. याचाच एक भाग म्हणून या वर्षी वर्ग १ च्या अधिकाऱ्यांच्या समुपदेशनाने बदल्या करण्याची पद्धत प्रथमच अंमलात आणली जात असल्याने हा निर्णय ऐतिहासिक आहे. या निर्णयाचे चांगले परिणाम आगामी काळात आपणास पाहावयास मिळतील, असे प्रतिपादन पशुसंवर्धन मंत्री मा. ना. पंकजा गोपीनाथ मुंडे यांनी केले.

पशुसंवर्धन विभागाच्या वतीने दि. १५ व १६ मे २०२५ या कालावधीत सार्वत्रिक बदल्या समुपदेशनाद्वारे करण्याची प्रक्रिया पशुसंवर्धन आयुक्तालयात पार पाडण्यात आली. या प्रकियेचा शुभारंभ ना. पंकजा मुंडे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी पशुवैद्यकीय अधिकारी वर्गाला मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. व्यासपीठावर विभागाचे सचिव मा. डॉ. रामास्वामी एन. (भा.प्र.से.), मा. आयूक्त पशुसंवर्धन डॉ. प्रवीणकुमार देवरे (भा.प्र.से.), उपसचिव मा. श्री. निवृत्ती मराळे, अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन डॉ. शितलकुमार

अतिरिक्त आयुक्त डॉ. शितलकुमार मुकणे, सहआयुक्त पशुसंवर्धन (मुख्यालय) डॉ. श्यामकांत पाटील आदी उपस्थित होते. मान्यवरांच्या उपस्थितीत समुपदेशनाद्वारे दोन दिवसीय सार्वत्रिक बदल्यांच्या प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली. पहिल्या दिवशी पशुधन विकास अधिकारी (गट-अ) या संवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदल्यांची प्रक्रिया पार पडली. यावेळी बदलीपात्र अधिकाऱ्यांनी समुपदेशानद्वारे बदली प्रक्रिया ही विभागाची परंपरा व्हावी व अधिकाऱ्यांना आपल्या पसंतीक्रमानुसार पशुसेवा करण्याची संधी मिळावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.

### लोकसेवक म्हणून पशुसेवा करण्याची उत्तम संधी: सचिव मा.डॉ. रामास्वामी एन.

पशुवैद्यकीय शिक्षणानंतर शासन सेवेत पदार्पण करणाऱ्या पशुवैद्यकांना लोकसेवक म्हणून पशुसेवा करण्याची उत्तम संधी प्राप्त होत असते. पशुसंवर्धन विभागाचा आजवरचा गौरव टिकवून ठेवत या विभागाची प्रतिष्ठा आणखी उंचावण्याची सामुहिक जबाबदारी आपणा सर्वांवर आहे. त्यासाठी पशुवैद्यकीय सेवांची उपलब्धता क्षेत्रीय स्तरावर सहजतेने करुन देणे आवश्यक आहे. या कामात समर्पित वृत्तीने सर्वांनी योगदान देत विभागाचा नावलौकीक वाढवावा, असे आवाहन उपस्थित अधिकारी वर्गाला मार्गदर्शन करताना विभागाचे सचिव मा. डॉ. रामास्वामी एन. यांनी केले.

प्रक्रियेच्या यशस्वीतेसाठी डॉ. शितलकुमार मुकणे व डॉ. श्यामकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली नोडल अधिकारी म्हणून डॉ. प्रशांत भड (उपआयुक्त पशुसंवर्धन, पशुसंवर्धन आयुक्तालय) यांनी काम पाहिले.

माहितीची उपलब्धता, नियोजनबद्ध कार्यपद्धती व इन कॅमेरा पार पडलेल्या प्रक्रियेबद्दल विभागाचे सचिव मा. डॉ. रामास्वामी एन., आयुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रवीणकुमार देवरे व उपसचिव श्री. निवृत्ती मराळे यांनी समाधान व्यक्त केले. यावेळी बदलीपात्र अधिकाऱ्यांनी समुपदेशानद्वारे बदली प्रक्रिया ही विभागाची परंपरा व्हावी व अधिकाऱ्यांना आपल्या पसंतीक्रमानुसार पशुसेवा करण्याची संधी मिळावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.



## ५६१ पशुधन विकास अधिकारी, ६१ सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन यांना मिळाली पसंतीच्या ठिकाणी बदली

पशुसंवर्धन विभागातील अधिकाऱ्यांच्या सार्वत्रिक बदल्यांमध्ये पारदर्शकता निर्माण करण्यासाठी व प्रत्येक अधिकाऱ्याला त्याच्या शैक्षणिक गुणवत्तेनुसार अपेक्षित ठिकाणी सेवा बजावण्याची संधी मिळावी, यासाठी समुपदेशन पद्धतीने बदल्या करण्याचा निर्णय मा. पंकजा मुंडे, मंत्री पशुसंवर्धन यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला होता. या निर्णयानुरुप प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडत पशुसंवर्धन विभागातील ५६१ पशुधन विकास अधिकारी व ६१ सहाय्यक आयुक्तांच्या पसंतीक्रमानुसार बदल्या करण्यात आल्या आहेत. विभागाच्या या निर्णयाबद्दल अधिकारी वर्गाकडून समाधान व्यक्त करण्यात येत असून, आगामी काळात या निर्णयाचे सकारात्मक परिणाम दिसून येतील, असा विश्वास विभागाचे सचिव मा. डॉ. रामास्वामी एन. यांनी व्यक्त केला.



## 'महापशुधन वार्ता' चे प्रकाशन

पशुसंवर्धन विभागाने पशुवैद्यकीय सेवा, धोरणात्मक निर्णय व योजनांच्या अंमलबजावणीबाबत जनजागृती करण्यासाठी 'महापशुधन वार्ता' या शिर्षकांतर्गत डिजीटल ई-मासिक सुरु करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार 'महापशुधन वार्ता' या मासिकाच्या पहिल्या अंकाचे प्रकाशन पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजा मुंडे, विभागाचे सचिव मा. डॉ. रामास्वामी एन., आयुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रवीणकुमार देवरे, उपसचिव श्री. निवृत्ती मराळे, अतिरिक्त आयुक्त डॉ. शितलकुमार मुकणे, सहआयुक्त पशुसंवर्धन (मुख्यालय) डॉ. शामकांत पाटील आदींच्या हस्ते करण्यात आले.

पशुपालकांना पशुसंवर्धनाच्या व्यवसायाची माहिती सहजपणे उपलब्ध व्हावी व आधुनिक व्यवसाय व्यवस्थापन पद्धतीनुसार पशुपालकाच्या उत्पन्नात भर पडावी, या उद्देशाने विभागाने हे ई-मासिक सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे. प्रत्येक पशुपालकाला हे मासिक एका क्लिकवर उपलब्ध व्हावे, यासाठी विभागामार्फत मासिकाच्या अंकाचा 'क्युआर कोड' तयार करण्यात आला आहे. या क्युआर कोडचे अनावरण उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

महापशुधन वार्ता

महाराष्ट्र शासन, पशुसंवर्धन विभाग

क्यू आर कोड स्कॅन करा व अंक मिळवा




# पशुसंवर्धनाच्या व्यवसायाला 'कृषी'चा दर्जा देण्यासाठी प्रयत्नशील: मा. उपमुख्यमंत्री ना. श्री. अजित पवार

**बीएसएल-३ व बीएसएल-२ प्रयोगशाळा, राष्ट्रीय संदर्भिय लस चाचणी गुणनियंत्रण प्रयोगशाळा व सुपर स्पेशालिटी व्हेटरनरी हॉस्पिटल, औंध या संस्थांचे उद्घाटन**

मानवाचे व पशुंचे ना**भारतरत्न अटलबिहारी बाजपेयी रोग अन्वेषण विभाग औंध, पुणे-६७**

ते अनादी काळापासूनचे आहे. मानवाच्या प्रगतीत पशुधनाचा वाटाही मोलाचा आहे. राज्याच्या विकासात्मक स्थित्यतरांमध्ये पशुसंवर्धनाचे योगदानही नेहमीच उल्लेखनीय राहिले आहे. त्यामुळे ग्रामीण विकासाची प्रक्रिया अधिक व्यापक व गतिमान करण्यासाठी पशुसंवर्धनाच्या व्यवसायाला 'कृषी'चा दर्जा प्राप्त होण्यासाठी प्रयत्नशील राहू, असे प्रतिपादन राज्याचे मा. उपमुख्यमंत्री ना. श्री. अजित पवार यांनी केले.

राष्ट्रीय कृषि विकास योजनेतंर्गत, बीएसएल-३ व बीएसएल-२ प्रयोगशाळा, राष्ट्रीय संदर्भिय लस चाचणी गुणनियंत्रण प्रयोगशाळा व सुपर स्पेशालिटी व्हेटरनरी हॉस्पिटल, औंध या संस्थांचे उद्घाटन दि. २४ मे २०२५ रोजी ना. अजित पवार यांच्या शुभहस्ते व पशुसंवर्धन मंत्री मा. ना. श्रीमती पंकजा मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर गोसेवा आयोगाचे अध्यक्ष मा. ना. श्री. शेखर मुंदडा, मा. आ. उमा खापरे, विभागाचे सचिव मा. डॉ. रामास्वामी एन. (भा.प्र.से.), आयुक्त पशुसंवर्धन मा. डॉ. प्रवीणकुमार देवरे (भा.प्र.से.), अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन




अतिरिक्त आयुक्त डॉ. शितलकुमार मुकणे, सहआयुक्त (मुख्यालय) डॉ. श्यामकांत पाटील, पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्थेचे सहआयुक्त पशुसंवर्धन डॉ. याहयाखान पठाण, भारतरत्न अटल बिहारी बाजपेयी रोग अन्वेषण विभाग सहआयुक्त पशुसंवर्धन डॉ. गौरीशंकर हुलसरे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना मा. सचिव (पदुम) डॉ. रामास्वामी एन. यांनी पशुसंवर्धनाच्या विभागाच्या अलिकडील वाटचालीचा प्रागतिक आढावा सादर केला. राज्यात पशुसंवर्धनाच्या व्यवसायाला चालना देण्यासाठी आवश्यक सेवा व सुविधांचा दर्जा वाढविण्यासाठी पशुसंवर्धन विभाग प्रयत्नशील असून, या प्रयत्नांचाच एक भाग म्हणून राष्ट्रीय कृषि विकास योजनेतंर्गत, बीएसएल-३ व बीएसएल-२ प्रयोगशाळा, राष्ट्रीय संदर्भिय लस चाचणी गुणनियंत्रण प्रयोगशाळा व सुपर स्पेशालिटी व्हेटरनरी हॉस्पिटल, औंध या संस्थांचे कार्यन्वयन विभागामार्फत करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

## पशुपालकांच्या उत्पन्न वाढीसाठी समग्र प्रयत्न करुयात: ना. पवार

पशुसंवर्धन विभागाने राष्ट्रीय कृषि विकास योजनेतंर्गत, बीएसएल-३ व बीएसएल-२ प्रयोगशाळा, राष्ट्रीय संदर्भिय लस चाचणी गुणनियंत्रण प्रयोगशाळा व सुपर स्पेशालिटी व्हेटरनरी हॉस्पिटल, औंध या संस्थांचे कार्यान्वयन करून राज्याच्या विकासात आपला वाटा आणखी वाढविण्यासाठी सुरु केलेले प्रयत्न प्रशंसनीय आहेत. पशुसंवर्धनाच्या व्यवसायाने राज्याचे अर्थचक्र गतिमान ठेवण्यात महत्वाची भूमिका बजावली आहे. आता आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने पशुपालकांचे उत्पन्न वाढविण्यासाठी आपण सर्वांनी समग्र प्रयत्न करणे आवश्यक आहे. राज्य सरकार त्यासाठी भरीव आर्थिक निधीची तरतूद करण्यासाठी नेहमीच वचनबद्ध राहिल, असे आश्वासन यावेळी ना. अजित पवार यांनी देत विभागाच्या पुढीला वाटचालीस शुभेच्छा दिल्या.




पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था (IVBP), औंध या संस्थेला स्थापन झाल्यानंतर ६७ वर्षांच्या वाटचालीत प्रथमत:च **GOOD MANUFACTURING PRACTICES (GMP)** प्रमाणपत्र मिळाले आहे. आता या संस्थेमार्फत उत्पादीत सर्व जैविक उत्पादनांवर GMP प्रमाणित लोगो वापरता येणे शक्य होणार आहे. GMP प्रमाणपत्राचे अनावरण करताना राज्याचे मा. उपमुख्यमंत्री ना. श्री. अजित पवार, मा. पशुसंवर्धन मंत्री ना. श्रीमती. पंकजा मुंडे, पशुसंवर्धन विभागाचे सचिव मा. डॉ. रामास्वामी एन., आयुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रवीणकुमार देवरे, महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष श्री. शेखर मुंदडा, आ. उमा खापरे, अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन डॉ. शितलकुमार मुकणे, सहआयुक्त पशुसंवर्धन (मुख्यालय) डॉ. श्यामकांत पाटील, आयव्हीबीपी संस्थेचे सहआयुक्त पशुसंवर्धन डॉ. याहयाखान पठाण आदी.

## दूध भेसळ रोखण्यासाठी कडक कायदा करणार: मा. ना. पंकजा मुंडे

राज्यामध्ये पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सार्वत्रिक बदल्यांचा कार्यक्रम समुपदेशनाद्वारे पार पाडण्यात आला. विभागाच्या आजवरच्या इतिहासात पहिल्यांदाच अशा पद्धतीचा निर्णय घेण्यात आला. या ऐतिहासिक निर्णयामुळे पशुवैद्यकाच्या शिक्षण, कौशल्य व अनुभवानुसार त्याला अपेक्षित ठिकाणी लोकसेवा बजावण्याची संधी मिळाली. त्यामुळे पशुवैद्यकीय अधिकारी वर्गात आनंद व उत्साहाचे वातावरण आहे. आता पशुरोग निदानाची कार्यवाही जलद गतीने करण्यासाठी विभागाने राष्ट्रीय कृषि विकास योजनेतंर्गत, बीएसएल-३ व बीएसएल-२ प्रयोगशाळा, राष्ट्रीय संदर्भिय लस चाचणी गुणनियंत्रण प्रयोगशाळा व सुपर स्पेशालिटी व्हेटरनरी हॉस्पिटल, औंध या संस्थांचे कार्यान्वयन करून मोठे लक्ष्य गाठले आहे. ज्याचा सकारात्मक परिणाम पशुसंवर्धनातील व्यवसाय वृद्धीवर होणार आहे.

पर्यावरणामध्ये प्लास्टीक वापराचे दुष्परिणाम दृश्य स्वरुप घेऊ लागले आहेत. पशुधनालाही प्लास्टीकपासून मोठी बाधा निर्माण होत आहे. त्यामुळे प्लास्टीक बंदीबाबत राज्य सरकार निश्चितच कार्यवाही करेल, असा आशावाद व्यक्त करतानाच ना. पंकजा मुंडे यांनी राज्यात दूध भेसळीची समस्या अलिकडे जाणवू लागल्याचे सांगत अशा चुकीच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी लवकरच कडक स्वरुपाचा दूध भेसळ प्रतिबंधक कायदा केला जाणार असल्याचे सांगितले.

# सुपर स्पेशालिटी व्हेटरनरी हॉस्पिटलचे उद्घाटन




**पशुसंवर्धन आयुक्तालय, औंध, पुणे-४११०६७**

वाढत्या नागरिकीकरणामुळे पशुवैद्यकीय दवाखान्यात येणाऱ्या पशुरुग्णांपैकी ९५ ते ९६ टक्के पशुरुग्ण हे पाळीव प्राणी असल्याने पाळीव प्राण्यांवर उच्च प्रतीचे उपचार करण्याकरीता सुपर स्पेशालिटी व्हेटरनरी हॉस्पिटलची उभारणी औंध येथे करण्यात आली आहे. या हॉस्पिटलचे उद्घघाटन राज्याचे मा. उपमुख्यमंत्री ना. श्री. अजित पवार यांच्या हस्ते व मा. मंत्री, पशुसंवर्धन ना. श्रीमती पंकजा मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

सुपर स्पेशालिटी व्हेटरनरी हॉस्पिटलची उभारणी करीता प्रामुख्याने पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिका यांनी अनुक्रमे रु.३.०० व २.०० कोटी असा एकुण रु.५.०० कोटी आवश्यक निधी उपलब्ध करुन दिला. सदर निधीतून इमारत बांधकाम पूर्ण करणेत आले आहे. तसेच जिल्हा वार्षिक योजनेतून रु.४.७८ कोटी इतका निधी मंजूर करणेत आला असून, रु.४.६९ कोटी निधीस प्रशासकीय मान्यता प्रदान करणेत आली आली आहे. सदर निधीतून आवश्यक यंत्रसामग्रीची खरेदी प्रस्तावित आहे. **सुपर स्पेशालिटी व्हेटर्नरी हॉस्पिटलमध्ये** स्वागत कक्ष, चिकित्साकक्ष, शल्यचिकित्सा कक्ष लहान जनावरे, शल्यचिकित्सा कक्ष-मोठी जनावरे, रोगनिदान सुविधाकक्ष, क्ष-किरण सुविधा कक्ष, औषधे पुरवठा कक्ष, सभागृह, आंतररुग्ण कक्ष आदींची निर्मिती करण्यात आली आहे.




# भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी राज्यस्तरिय पशु रोग अन्वेषण प्रयोगशाळा पुणे, या संस्थेस अर्थसहाय्याकरीता केंद्र व राज्य शासनामध्ये सामंजस्य करार

पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभाग, भारत सरकार आणि पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग महाराष्ट राज्य यांच्यामध्ये भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी राज्यस्तरिय पशु रोग अन्वेषण प्रयोगशाळा पुणे,या संस्थेस केंद्र शासनाद्वारे अर्थसहाय्य करणेकरीता सामंजस्य करार दि. ०४ जून, २०२५ रोजी दिल्ली येथे पार पडला.

सदर कार्यक्रमास केंद्र शासनाच्या पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय या विभागाच्या सचिव मा. श्रीमती आलका उपाध्याय, अतिरक्त सचिव ( केंद्रीय पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व विभाग मत्स्य व्यवसाय, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय, भारत सरकार) मा. श्री. रामा शंकर सिन्हा, आयुक्त पशुसंवर्धन (केंद्रीय पशुसंवर्धन विभाग ) मा. डॉ. अभिजीत मिश्रा आदी उपस्थित होते. राज्य शासनाच्या वतीने पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व विभाग मत्स्य व्यवसाय विभागाचे सचिव मा. डॉ. रामास्वामी एन., यांनी करारावर स्वाक्षरी करत राज्य पशुसंवर्धन विभागाच्या पुढील वाटचालीसाठी हा करार सहाय्यकारी असल्याची भावना व्यक्त केली.

राज्यातील भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी राज्यस्तरीय पशु रोग अन्वेषण प्रयोगशाळा, पुणे ही पशुधनातील रोग निदानासाठी कार्यरत संस्था आहे. या प्रयोगशाळेस सन २००० पासून केंद्र शासनाने पश्चिम विभागिय संदर्भ प्रयोगशाळेचा दर्जा प्रदान केलेला आहे.

भारत सरकारच्या पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विभागाने संबंधित राज्यांद्वारे (एनईआरडीडीएलसाठी आसाम, एनआरडीडीएलसाठी महाराष्ट्र, एनआरडीडीएलसाठी पंजाब, ईआरडीडीएलसाठी पश्चिम बंगाल, एसआरडीडीएलसाठी केव्हीएएफएसयू आणि आयसीएआर एनआयएचएसएडी भोपाळ) आरडीडीएल आणि सीडीडीएल यांच्याशी सामंजस्य करार केला, ज्यामुळे रोगनिदान पायाभूत सुविधा मजबूत होतील. या सहकार्याचे उद्दिष्ट देशभरात प्रयोगशाळेची सुसज्जता वाढवणे आणि प्राण्यांच्या आरोग्यासाठी आवश्यक सेवांचा दर्जा सुधारणे आहे. हे एक लवचिक आणि प्रतिसाद देणारे पशुवैद्यकीय निदान नेटवर्क तयार करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

– डॉ. रामास्वामी एन. (सचिव, पदुम)

याद्वारे केंद्र शासनाने या प्रयोगशाळेच्या कार्यक्षेत्रात महाराष्ट्रासह गुजरात, मध्यप्रदेश, छत्तीसगड, गोवा ही ५ राज्य आणि दादरा नगरहवेली व दिव-दमण हे २ केंद्रशासित प्रदेश जोडले आहेत. या राज्यांना पशुरोग निदानाच्या बाबतीत आवश्यक तांत्रिक सहाय्य करणे अभिप्रेत आहे. तसेच या द्वारे सदर राज्यांमध्ये केंद्र शासनाच्या पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभागाचे विविध रोग नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत नमुने तपासणी, रोग प्रादुर्भाव विषयक धोरणांच्या अंमलबजावणीसाठी सहकार्य करणे अभिप्रेत आहे.

सांमजस्य करारामुळे प्रस्तुत प्रयोगशाळेस केंद्रशासनाच्या पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभागाद्वारे अर्थ सहाय्य मिळणार आहे. सदर निधी प्रयोगशाळेची संयंत्रे व उपकरणे सुसज्ज ठेवण्यासाठी, वार्षिक देखभाल व दुरुस्ती करारासाठी, रोग निदान चाचण्यांसाठी आवश्यक साधनसामुग्री पुरवठा करणे यासाठी, तसेच कंत्राटी मनुष्यबळ उपलब्ध करुन घेण्यासाठी जसे प्रयोगशाळा तंत्रज्ञ, सुरक्षारक्षक आणि स्वच्छता कामगार इत्यादी बाबींसाठी येणारा खर्च उपलब्ध होणाऱ्या निधीतून करता येणार आहे.

नुकतेच प्रस्तुत प्रयोगशाळच्या जैवसुरक्षा स्तर-२ व ३ दर्जाच्या इमारतीचे उद्घाटन पार पडलेले आहे. या प्रयोगशाळेतील सर्व सयंत्रे व प्रणालींचे सुरळीत कार्यान्वयन तसेच पशुरोग निदानाचे कार्य सुलभरित्या चालावे, यासाठी कंत्राटी मनुष्यबळाची आवश्यकता राहणार आहेच. त्यानुसार विभागाच्या नवीन आकृतीबंधात तरतूद आहे. यासर्व बाबींचा आर्थिक भार राज्य शासनाच्या कोषावर येणारच होता. तथापि, या सामंजस्य कराराद्वारे मिळणाऱ्या अर्थ सहाय्यामुळे सदर आर्थिक भार कमी होण्यास केंद्र शासनाचा हातभार लागणार आहे.

यामुळे राज्यातील व प्रयोगशाळेस जोडलेल्या ७ राज्य / केंद्रशासित प्रदेशातील पशुधन व पर्यायाने पशुपालकांचे हित साधण्याचे प्रयत्नास / कार्यास बळकटी मिळणार आहे.

यावेळी पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व विभाग मत्स्य व्यवसाय विभागाचे सचिव मा. डॉ. रामास्वामी एन., यांनी सदर प्रयोगशाळेत कार्यरत अधिकारी-कर्मचारी यांचे वेतनासाठी अर्थसहाय्य पुरविण्याबाबत विचार व्हावा, ही बाब त्यांच्या संबोधनातून सुचविली. सदर प्रयोगशाळेकरीता एनएबीएल प्रमाणिकरण मिळविण्यासाठी कार्यवाही सुरु करण्याबाबत अनुकूलता दर्शवत डॉ. रामास्वामी एन. यांनी राज्यातील पशुवैद्यकीय जैवपदार्थ निर्मिती संस्थेस जीएमपी मानक प्राप्त झाल्याचे सर्व उपस्थितांना अवगत केले. तसेच सामंजस्य कराराच्या अनुषंगाने आवश्यक निधीची मागणी त्वरीत सादर करण्यात येईल असे ही मा. सचिव पदुम यांनी उपस्थित मा. केंद्रीय सचिव यांना सादर केले.सदर सामंजस्य करार दर ५ वर्षांनी पुन्हा सुधारीत करण्याची सोय आहे. या कराराद्वारे पशुरोग निदान कार्यक्रम केंद्रशासनाच्या अर्थसहाय्याने नवीन जोमाने शेतकरी व पशुपालकांच्या हितासाठी कार्यरत राहण्यासाठी वाटचाल करणार आहे.





# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त पशुसंवर्धन विभागामार्फत विविध कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन

**पशुसंवर्धन आयुक्तालय, औंध, पुणे-४११०६७**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य समाजसेवा, धर्मनिष्ठा आणि कुशल प्रशासनाचे प्रतीक असून, ते महाराष्ट्र राज्याच्या प्रगत व उन्नत वाटचालीसाठी नेहमीच पथदर्शी ठरले आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य, विचार आणि प्रेरणादायी जीवनगाथा जनसामान्यांपर्यंत प्रभावीपणे पोहचविणे आवश्यक असल्याने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती दिनाचे औचित्य साधून दि.३१ मे २०२५ रोजी पशुसंवर्धन विभागाच्या मंत्री मा. ना. पंकजाताई मुंडे यांचे निर्देशानुसार व सचिव मा. डॉ. रामास्वामी एन. (भा.प्र.से.) व आयुक्त पशुसंवर्धन मा. डॉ. प्रवीणकुमार देवरे (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यभर विविध कार्यक्रमांचे आयोजन पशुसंवर्धन विभागामार्फत करण्यात आले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या भारतीय इतिहासातील एक तेजस्वी, कर्तबगार व दुरदृष्टी असणा-या स्त्रीशक्तीचे प्रतीक आहेत. त्यांनी धार्मिक सहिष्णुता, समाजकल्याण, सार्वजनिक बांधकाम, न्यायप्रविष्ठ प्रशासन आणि स्त्री शिक्षणाच्या माध्यमातून आदर्श राज्यकारभाराची उभारणी केली. यास अनुसरुन शासन स्तरावरुन याबाबत "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर" यांच्या ३०० व्या जयंती वर्षानिमित्त "पुण्यश्लोक ३००" या विशेष बोधचिन्हाचा (LOGO) राज्य शासनाच्या शासकीय पत्रव्यवहारात वापर करण्याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत. यास अनुसरुन "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर" यांच्या ३०० व्या जयंती वर्षानिमित्त पशुसंवर्धन विभागामार्फत अधिनस्त संस्थांमध्ये कार्यालय/ दवाखाना परिसर स्वच्छता व सुशोभिकरण करणे, गाव पातळीवर वंधत्व / सर्वोपचार शिबिरांचे आयोजन करणे, फिरस्ती मेंढपाळांची भेट घेऊन त्यांना तांत्रिक मार्गदर्शन करणे, मेंढपाळांच्या शेळ्या-मेंढ्यांचे मान्सून पूर्व लसीकरण करणे, पशुधनाचे जंतनिर्मूलन, गोचीड निर्मूलन, करडे / कोकरे मरतूक कमी करणेबाबत उपाययोजना करणे, मेंढपाळांसाठी तांत्रिक मार्गदर्शन करण्यासाठी शिबिर / परिसंवादाचे आयोजन करणे, वृक्ष लागवड करणे इत्यादी उपक्रम राबविण्यात आले.

"पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर" यांच्या ३०० व्या जयंती वर्षानिमित्त विभागाच्या मुख्यालयातही अभिवादनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० जयंतीनिमित्त अतिरिक्त आयुक्त तथा व्यवस्थापकीय संचालक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मेंढी व शेळी विकास महामंडळ डॉ. शितलकुमार मुकणे यांच्या मार्गदर्शनाखाली महामंडळाच्या अधिनस्त मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्रांवर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

"पशुसंवर्धन विभागाच्या या उपक्रमांमुळे मेंढी-शेळी पालकांशी थेट संवाद साधता येऊन शासनाचे विविध उपक्रम, योजना तसेच शेळी-मेंढी तांत्रिक व्यवस्थापनाविषयी माहिती पशुपालकांना देणे शक्य होईल. तसेच शेळी-मेंढीपालनाला आधुनिक व्यवसाय व्यवस्थापनाच्या माध्यमातून अधिक किफायतशीर करण्यासाठी विभागाला आवश्यक धोरणांची निर्मिती व अंमलबजावणी करणे सुलभ होईल", असा विश्वास व्यक्त करत मा. मंत्री, पशुसंवर्धन ना. श्रीमती पंकजाताई मुंडे यांनी उपक्रमांच्या यशस्वीतेसाठी विभागास शुभेच्छा दिल्या.










# १०० दिवसांचा सुधारणा कार्यक्रम

## विभागीय स्तरावर पशुसंवर्धन विभागाच्या कार्यालयांची गौरवपूर्ण कामगिरी

शासनात लोकाभिमुखता आणणारा १०० दिवसांचा सुधारणा कार्यक्रम या उपक्रमाचा पहिला टप्पा यशस्वीपणे पार पडला असूंन, पहिल्या टप्प्यात १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण करणाऱ्या शासनाच्या पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास विभागाला दुहेरी सन्मान प्राप्त झाला आहे. मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मा. सचिव (पदुम) श्री. रामास्वामी एन. यांना अभिनंदन पत्र देऊ गौरविण्यात आले. या उपक्रमातंर्गत पशुसंवर्धन विभागाच्या विविध कार्यालयांनी विभागस्तरावर चमकदार कामगिरी केली.

शासनाच्या '१०० दिवसांची कार्यालयीन सुधारणांच्या विशेष मोहिमेश'त दुसऱ्या टप्प्यातंर्गत सर्वोत्कृष्ट कामगिरी बजावलेल्या महाराष्ट्रातील विभागीय स्तरावरील कार्यालयांचा निकाल जाहिर करण्यात आला. यामध्ये पशुसंवर्धन विभागाच्या अधिनस्त कार्यालयांमधून प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन, नाशिक विभाग या कार्यालयाने प्रथम, प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, लातूर विभाग, या कार्यालयाने द्वितीय तर प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन, पुणे विभाग, पुणे या कार्यालयाने तृतीय क्रमांक प्राप्त केला.

पशुसंवर्धन विभागाने १०० दिवसांचा सुधारणा कार्यक्रम या उपक्रमातंर्गत मा. सचिव (पदुम) डॉ. रामास्वामी एन. व आयुक्त पशुसंवर्धन मा. डॉ. प्रवीणकुमार देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली ७ कलमी कृती आराखडा तयार करण्यात आला. यामध्ये विभागाचे संकेतस्थळ अद्यावतीकरण, सुकर जीवनमान, स्वच्छता, जनतेच्या तक्रारींचे निवारण, कार्यालयीन सोयीसुविधा, क्षेत्रीय कार्यालयांना भेटी व गुंतवणूक प्रसार या बाबींचा समावेश होता. या लक्ष्यांकित बाबींची १०० टक्के पुर्तता करण्यासोबतच पशुसंवर्धन विभागाने ई-ऑफिस प्रणालीतंर्गत आवश्यक सर्व सुविधा कार्यान्वित केल्या. याशिवाय अधिकारी-कर्मचारी प्रशिक्षण, सेवाविषयक बाबी आणि कार्यालयीन व क्षेत्रीय कामकाजासाठी कृत्रिम बुद्धीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करण्यावरही भर देण्यात आला.

१०० दिवसांच्या सुधारणा कार्यक्रम या उपक्रमातंर्गत पशुसंवर्धन विभागाने बीएसएल-२ व बीएसएल-३ प्रयोगशाळेच्या नवीन इमारतीमध्ये कार्यान्वयन, शेळ्यांमधील देवी व लम्पी चर्म रोग प्रतिबंधक लस निर्मिती, १०० टक्के रोगप्रतिबंधक लसीकरण, पुणे येथे c-GMP मानकांनूसार राष्ट्रीय संदर्भ लस

चाचणी प्रयोगशाळेचे कार्यान्वयन, खनिज मिश्रण निर्मिती केंद्र, नागपुरचे कार्यान्वयन तसेच दि. २५ नोव्हेंबर २०२४ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत २१ व्या राष्ट्रीय पशुगणनेचे कार्य पशुसंवर्धन विभागाने पूर्ण केले. या पशुगणनेसाठी ७४७७ प्रगणक व १४२४ पर्यवेक्षकांचा नेमणूक करत पशुसंवर्धन विभागाने विहित मुदतीत पशुगणनेचे कार्य यशस्वीपणे पार पाडले.

मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी दि. ६ मे ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत पुढील १५० दिवसांचा कार्यक्रम जाहीर केला असून, त्यासाठी विभागाने पूर्ण क्षमतेने नियोजन व प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली आहे.

## **टप्पा-२** विभाग स्तरावर सर्वोत्कृष्ट कामगिरी बजावलेली महाराष्ट्रातील तालुका स्तरीय शासकीय कार्यालये यादी

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | प्रथम क्रमांक | द्वितीय क्रमांक | तृतीय क्रमांक |
|---|---|---|---|---|
| | **अमरावती विभाग** | | | |
| १ | सहायक पशुसंवर्धन आयुक्त, तालुका लघु पशु सर्वचिकित्सालय | दर्यापूर | मुर्तिजापूर | मलकापूर |
| २ | पशुधन विकास अधिकारी | तिवसा | रिसोड | डोणगाव ता.मेहकर |
| | **नागपूर विभाग** | | | |
| १ | सहायक पशुसंवर्धन आयुक्त, तालुका लघु पशु सर्वचिकित्सालय | वर्धा | वडसा | उमरेड |
| २ | पशुधन विकास अधिकारी | खेमजाई ता. वरोरा | वडगाव ता. तिरोडा | ब्राह्मणवाडा ता. कारंजा |
| | **छत्रपती संभाजीनगर विभाग** | | | |
| १ | सहायक पशुसंवर्धन आयुक्त, तालुका लघु पशु सर्वचिकित्सालय | सेलू | अंबाजोगाई | पैठण |
| २ | पशुधन विकास अधिकारी | खरोळा, ता. रेणापूर | नांदेड | वसमत |
| | **पुणे विभाग** | | | |
| १ | सहायक पशुसंवर्धन आयुक्त, तालुका लघु पशु सर्वचिकित्सालय | खेड | पंढरपूर | इस्लामपूर |
| २ | पशुधन विकास अधिकारी | केडगाव | हरळी बुद्रुक | शिरवळ |
| | **नाशिक विभाग** | | | |
| १ | सहायक पशुसंवर्धन आयुक्त, तालुका लघु पशु सर्वचिकित्सालय | अकोले | धरणगाव | शिंदखेडा |
| २ | पशुधन विकास अधिकारी | महिरावणी, ता. नाशिक | विवरा, ता. रावेर | उक्कलगांव, ता. श्रीरामपुर |
| | **कोकण विभाग** | | | |
| १ | सहायक पशुसंवर्धन आयुक्त, तालुका लघु पशु सर्वचिकित्सालय | वसई | अलिबाग | कणकवली |
| २ | पशुधन विकास अधिकारी | कणकवली | पालघर | शहापूर |

# शासनाच्या १०० दिवसांच्या सुधारणा कार्यक्रमांतर्गत टप्पा-२ मधील विभाग स्तरावर सर्वोकृष्ट कामगिरी करणारी कार्यालये





**कार्यालय** – जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय वर्धा, जि. वधा

**संस्था प्रमुख:** डॉ. प्रविण पी. तिखे

**पदनाम:** सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन,

**संपर्क क्रमांक:** ९४२३४१४२८४

**लक्षणीय कामगिरी:** सदर दवाखाना शहरी भागामध्ये येत असल्यामुळे मोठ्या जनांवरांसोबतच पाळीव प्राणी जसे की, कुत्रे, मांजर जास्त प्रमाणात औषधोपचाराकरिता येतात. त्यांना सांसर्गिक रोग प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून दर गुरुवारी रेबीज रोग प्रतिबंधात्मक लसीकरण करण्यात येते.सदर उपक्रम मागील दोन वर्षापासून सुरु असून आजतागायत २८९४ लसीकरण करण्यात आलेले आहे.

श्वानांचा जन्मदर नियंत्रित ठेवणेकरीता वर्षभर महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शुक्रवारी शिबिरे घेऊन एकुण २३५ निर्बीजीकरण शस्त्रक्रिया पार पाडण्यात आलेल्या आहेत. जनावरांच्या रोग निदानाकरिता संस्थेमध्ये रक्त तपासणी यंत्र असून, मागील वर्षात १७६० रक्त तपासण्या करण्यात आलेल्या आहेत.

जनावरांमधील आजारांचे निदानाकरिता बायोकेमिस्ट्री विश्लेषक असून त्याद्वारे रक्त, मुत्र व सीरम यांसारख्या जैविक नमुन्यांचे विश्लेषण करुन उल्लेखनिय कार्याकरिता संस्थेतील पशुधन विकास अधिकाऱ्यास "ज्येष्ठ पशुवैद्यक प्रतिष्ठाण नागपूर" विभागातून प्रयोगशाळेत उत्कृष्ट काम करणारे अधिकारी म्हणून पुरस्कार प्राप्त झालेला आहे. मागील वर्षी लहान व मोठ्या अश्या एकूण ५३९ शस्त्रक्रिया पार पाडण्यात आलेल्या आहेत. रोगनिदानाकरिता २६३ क्ष- किरण तपासण्या पार पाडण्यात आलेल्या आहेत. संस्थेच्या आवारात दिशादर्शक, विभागांची नावे दर्शविणारे माहिती फलक,जनावरांना पाण्याचे टाके, निगराणी कॅमेराचा वापर, अभ्यांगताकरिता प्रतिक्षालय, पिण्याच्या पाण्याची सोय, स्वतंत्र स्वच्छतागृह ई. सोयी सुविधांचा पशुपालकांना निश्चितच लाभ होत आहे.

# शासनाच्या १०० दिवसांच्या सुधारणा कार्यक्रमांतर्गत टप्पा-२ मधील विभाग स्तरावर सर्वोकृष्ट कामगिरी करणारी कार्यालये



**कार्यालय: तालुका लघु पशु**वैद्यकीय सर्वचिकित्सालय पंढरपुर, जि. सोलापुर
**संस्था प्रमुख:** डॉ. राजेंद्रनाथ सोमनाथ सावळकर
**पदनाम:** सहाय्यक आयुक्त पशूसंवर्धन,
**संपर्क क्रमांक:** ९१५८४०७७२२
**लक्षणीय कामगिरी:**

❖ **स्वच्छता व दुरुस्ती:** दवाखानाच्या इमारतीवर संरक्षण भिंतीवर मोठ्या झाडांच्या आलेल्या फांद्या कापून टाकण्यात आल्या. गॅस्ट्रो वार्ड स्वतंत्रपणे वेगळा बांधण्यात आला. तसेच संपूर्ण परिसराची स्वच्छता करणेत आली.

**अत्याधुनिक उपकरणांचा प्रभावीपाने वापर:**

❖ Serum Biochemical Analyse: पुरवठा झालेले मशीन चुकीचे रिपोर्ट दाखवत असल्यामुळे सदर मशीनच्या कंपनीला संपर्क साधून व पाठपुरावा करून दुसरी नवीन मशीन मिळाली.

❖ ILR – पुरवठा झालेले ILR मशीन खराब झाल्यामुळे सदर मशीनच्या कंपनीला संपर्क साधून व पाठपुरावा करून दुसरी नवीन ILR मशीन मिळाली.

❖ क्ष-किरण मशीन, सोनोग्राफी मशीन, मायक्रोस्कोप व ब्लड ॲनालायझर यांचा नियमित वापर सुरु केला


❖ अभिलेखे वर्गीकरण करणेत आले.

❖ कार्यालयाचे विद्युत बिल दरमहा रु. १२०००-१४०००/- येत असल्यामुळे अनेक अडचणी येत होत्या, परंतु सदरच्या विद्युत कनेक्शनची वर्गवारी व मंजूर भर कमी केल्यामुळे सध्या दरमहा बिल रु २५००-३०००/- इतके येत आहे.

# शासनाच्या १०० दिवसांच्या सुधारणा कार्यक्रमांतर्गत टप्पा-२ मधील विभाग स्तरावर सर्वोकृष्ट कामगिरी करणारी कार्यालये








**कार्यालय:** तालुका लघु पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय खेड, जि. पुणे
**संस्था प्रमुख:** डॉ. प्रशांत मुरलीधर पोखकर
**पदनाम:** सहाय्यक आयुक्त पशूसंवर्धन,
**संपर्क क्रमांक:** ८३२९४८७७२५
**लक्षणीय कामगिरी:**

तालपसचि खेड अंतर्गत १०० दिवसीय सुधारणा कार्यक्रम अंतर्गत x-ray मशीनद्वारे ग्रामीण भागातील पशुपालकांच्या जनावारांचे रोग निदानातंर्गत मोडलेल्या हाडाचे अचूक निदान करुन Plaster द्वारे उपचार करुन प्राण्यांना जीवदान दिले. तसेच x-ray द्वारे रोगनिदान करुन गाईमध्ये आढळून आलेल्या अखाद्य वस्तू ऑपरेशनद्वारे दूर करुन गाईचे प्राण वाचविण्यात यशस्वी. तसेच रुग्ण्यालयातील रक्त तपासणीद्वारे विविध आजारांचे निदान करुन गाई, बैल व कुत्रा, मांजर इ. चे करीता उपयोगी ठरले. १०० दिवसीय सुधारणा कार्यक्रम अंतर्गत उपचार जंत निर्मुलन मोहिमेच्या स्वरुपात राबवल्या. तसेच वंधत्व निवारण शिबिराचे आयोजन करुन गाई-म्हशीचे वंध्यत्व निवारण करुन कृत्रिम रेतन करण्यात आले.

दिवसीय सुधारणा कार्यक्रम अंतर्गत पशुसंवर्धनविषयक विविध योजनांची माहिती पशुपालकांना जसे कुक्कुटपालन, शेळीपालन इ. योजना समजावून सांगितल्या आहेत.
२. सोनोग्राफी मशीनसह निर्लेखन प्रक्रिया पूर्ण करण्याची कार्यवाही.
३. सर्व सुविधा, सोलर पॅनल, अद्यावत प्रयोगशाळा बाबत कार्यवाही पूर्ण.

# शासनाच्या १०० दिवसांच्या सुधारणा कार्यक्रमांतर्गत टप्पा-२ मधील विभाग स्तरावर सर्वोकृष्ट कामगिरी करणारी कार्यालये







**कार्यालय** – पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ खेमजई, ता. वरोरा, जि. चंद्रपूर, विभाग- नागपुर

**संस्था प्रमुख:** डॉ. सतीश काशिनाथ अघडते

**पदनाम:** पशुधन विकास अधिकारी,

**संपर्क क्रमांक:** ९४२३९१०७३७

**लक्षणीय कामगिरी:** शासन, एनजीओ व लोकसहभागद्वारे आदिवासीबहुल भागातील पशुवैद्यकीय दवाखाना लोकाभिमुख केला. यामध्ये १२ नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आले. लोकसहभागद्वारे एकूण १,३३,५१० रुपये खर्चाचे ७ उपक्रम राबविले.

- वॉल पेंटिंग करून “मुक्या प्राण्यांचा बोलका दवाखाना” उपक्रम
- अर्धा एकर निरोपयोगी जागेवर बहुवार्षिक चारापिकांची कुंड्यांमध्ये लागवड करून पशुपालकाच्या माहितीकरिता, चार प्रात्यक्षिक प्रकल्पाची उभारणी
- हायड्रोपोनिक चारा निर्मिती,
- अझोला उत्पादन,
- जनावराचे मलमूत्र खत व्यवस्थापन
- गांडूळ खत वर्मी कंपोस्ट
- ग्रामपंचायत सामान्य निधीमधून जनावराच्या कठड्याला शेड बांधकाम व शुद्ध पाण्याची व्यवस्था
- शस्त्रक्रिया, रेबीज लसीकरण व कार्यमोहीम शिबिराचे आयोजन
- पशुपालकांना प्रशिक्षण व प्रात्यक्षिक कार्यक्रम
- शेतकऱ्यांच्या दारात मुरघास निर्मिती
- शेतकऱ्यांच्या दारात निकृष्ट चारा सकस करणे”.



वाहनांची वाणवा होती तेव्हा बैलगाडी हेच मालवाहतुकीचे पारंपारिक व तितकेच पर्यावरणपूरक साधन होते. आज २१ व्या शतकात साधनांची उपलब्धता वाढली असली तरी ग्रामीण भागात आजही पारंपारिक बैलगाडीचा वापर कृषी उत्पादनांच्या वाहतुकीसाठी केला जातो. इंधनाचा कुठलाही खर्च नसल्याने बैलगाडीचा आधार सर्वसामान्य शेतकऱ्यांना लाभदायक ठरत आहे.



प्रतिबंधात्मक लसीकरण हेच पशुधनाचे विविध रोगांपासून संरक्षण करण्याचे प्रभावी माध्यम आहे. पशुपालकांनी लसीकरणाबाबत आग्रही राहून पशुधनाच्या आरोग्यासह आपला व्यवसाय सुरक्षित करणे आवश्यक आहे. पशुसंवर्धन विभागामार्फत क्षेत्रीयस्तरावर विविध रोग प्रतिबंधक लसीकरण मोहिमांचे आयोजन करण्यात येत असते, त्याचा लाभ पशुपालकांनी घ्यावा.

# १३३ वा पशुसंवर्धन दिन

# नवी आशा नवी दिशा



पशुसंवर्धन विभागाची स्थापना दि. २० मे १८९२ रोजी झाली. त्यावेळी घोड्यांची पैदास व पशुधनाचे आरोग्य, हे या विभागाचे प्रमुख उद्दिष्ट होते. परंतु, याचा फायदा विशिष्ट क्षेत्रापुरताच मर्यादीत होता. पशुसंवर्धन विभागाची स्थापना मुंबई प्रांताकरिता मुलकी पशुवैद्यक खाते म्हणून झालेली होती. मुलकी पशुवैद्यक खात्याकडे अश्वपैदास, पशुरोग नियंत्रण व पशुवैद्यकीय अध्यापन ही तीन प्रमुख कार्य सोपविली गेली. कालपरत्वे विभागाच्या उद्दिष्टांमध्ये कालानुरूप भर पडत गेली. बदलत्या प्रवाहात अनुषंगिक धोरणांच्या अंमलबजावणीतून विभागाने राज्याच्या पशुसंवर्धनाच्या विकास व विस्ताराचे कार्य प्रभावीपणे केले. त्यामुळे हा विभाग आज लोकाभिमुख झाला आहे. विभागाचा आज १३३ वा स्थापना दिवस. या प्रदिर्घ प्रवासात पशुसंवर्धन विभागाचे बदलले वर्तमान व भविष्यातील ध्येयधोरणांचा आढावा घेणारा हा लेख...



**मा. डॉ. प्रवीणकुमार देवरे** (भा.प्र.से.)
आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य,
पुणे-६७



पशुसंवर्धन विभागाच्या स्थापनेनंतर विभागाच्या कार्यपद्धतीत बरीच स्थित्यंतरे घडून आली. केवळ पशुधनाच्या आजारासबंधी उपचार करण्यापुरते विभागाचे कार्य मर्यादित न राहता पशुधनाची आनुवंशिक सुधारणा करणे, जास्तीत जास्त दूध, अंडी, मांस व लोकर उत्पादन मिळवणे, तसेच त्या अनुषंगाने पशुसंगोपन व पशुपैदाशीची माहिती प्रशिक्षणाद्वारे पशुपालकांना देऊन रोजगार निर्मितीद्वारे तळागाळातील लोकांचा विकास करणे आदी विवक्षित कार्ये पशुसंवर्धन विभागाने प्रभावीपणे करण्यास सुरुवात केली. त्यामुळे आता या विभागामार्फत दिली जाणारी सेवा शहरांपासून खेड्यापाड्यापर्यंत व वाडी-वस्त्यांपासून दुर्गम आदिवासी भागापर्यंत जाऊन पोहोचली आहे.

सद्यस्थितीमध्ये निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतीमधील उत्पादन व उत्पन्नांची शाश्वती कमी-अधिक होत आहे. मात्र, पशुसंवर्धनाच्या व्यवसायामुळे शेतकऱ्यांना आता बाराही महिने पूरक व्यवसाय मिळणे शक्य झाले आहे. त्यामुळे दिवसेंदिवस पशुसंवर्धनाचा व्यवसाय केवळ शेतीपूरक व्यवसाय न राहता शाश्वत उत्पन्न देणारा शेतकऱ्यांच्या मुख्य व्यवसाय म्हणून प्रस्थापित होत आहे. त्यामुळे विभागाने कुक्कुटपालन, उच्च वंशावळीच्या गुणात्मक पशुधनाची संख्यात्मक वाढ, स्थानिक जातीच्या गोवंशामध्ये सुधारणा, शेळी-मेंढी विकास या कार्यक्रमावर भर देऊन शेतकऱ्यांना व आर्थिक दुर्बल घटकांसह सुशिक्षीत बेरोजगारांना हक्काचा रोजगार उपलब्ध करुन देण्यावर लक्ष केंद्रीत केले आहे.

पशुसंवर्धन विभागाने शेतकरी / पशुपालकांना प्रशिक्षण देणे, जनावरांसाठी लसीकरण मोहिमा, वंध्यत्व निवारण शिबीरे, अनुवंशिक सुधारणा कार्यक्रम, शेतकऱ्यांसाठी कार्यशाळा, वैरणीचे बियाणे, गवताची सुधारीत ठोंबे, वैरणीवर प्रक्रियेचे तंत्रज्ञान यासारखे उपयुक्त कार्यक्रम मोठ्या प्रमाणात राबवून पशुसंवर्धन व्यवसाय समृध्द होण्यास मोठा हातभार लावला आहे.

आज राज्यात सर्व खेडोपाड्यात पसरलेल्या ४८५३ पशुवैद्यकीय संस्थांच्या माध्यमातून आजारी पशुधनावर उपचार, बेरड वळूंचे खच्चीकरण, कृत्रिम रेतन, संसर्गजन्य रोगप्रतिबंधक लसीकरण, वंध्यत्व निदान व निवारण, वैरण विकास कार्यक्रम व शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी या सर्व बाबी प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. त्यामुळेच कृषि व सलंग्न क्षेत्राच्या एकूण राज्य सकल उत्पादनाच्या २५ ते २८ टक्के लक्षणीय वाटा पशुसंवर्धन क्षेत्रातील उत्पादनांचा आहे. पशुसंवर्धन विभागाने आपल्या १३३ वर्षांच्या गौरवपूर्ण वाटचालीत कालसुसंगत बदलांचा अंतर्भाव आपल्या कार्यपद्धतीत केला आहे. त्यामुळे आज ग्रामीण भागात पशुसंवर्धनाच्या व्यवसायाच्या स्तर उंचावला असून, ग्रामीण महाराष्ट्राचे अर्थचक्र गतिमान होण्यास हातभार लागला आहे. शासनात लोकाभिमुखता आणणारा '१०० दिवसांचा सुधारणा कार्यक्रम' या उपक्रमाचा पहिला टप्पा यशस्वीपणे पार पडला असून, पहिल्या टप्प्यात १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण करणाऱ्या शासनाच्या पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास विभागाला दुहेरी सन्मान प्राप्त झाला आहे. मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अभिनंदन पत्र देऊन पशुसंवर्धन विभागाला गौरविण्यात आले आहे. राज्यामध्ये परळी व बारामती या ठिकाणी नव्याने दोन शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालये प्रस्तावित करण्यात आली आहेत. यामुळे राज्यात पशुवैद्यकीय स्नातकांची संख्या वाढून पशुवैद्यकीय सेवांसाठी कुशल व तज्ञ पशुवैद्यकीय मनुष्यबळ उपलब्ध होणार आहे. मागील दोन-तीन वर्षांपासून राज्यात लम्पी स्कीन डिसीजचा प्रादुर्भाव आढळून येत होता. तो नियंत्रणात आणण्यासाठी पशुवैद्यकीय जैवपदार्थ



निर्मिती संस्था यांचेमार्फत आदर्श उत्पादन मानकांनुसार तयार करण्यात आलेल्या प्रयोगशाळेत लम्पी रोगप्रतिबंधक लसीचे उत्पादन सुरु होणार आहे. पशुसंवर्धन विभागातंर्गत बीएसएल-थ्री (जैवसुरक्षा स्तर - ३) या प्रयोगशाळेची निर्मिती करण्यात आली आहे. बर्ड फ्ल्यु, विषाणु व जिवाणुजन्य रोग निदानासाठी ही अत्याधुनिक प्रयोगशाळा सज्ज झाली आहे. रोग प्रार्दुभाव नियंत्रण करणे, पशु व कुक्कुट पक्षांची मरतुकीवर नियंत्रण व शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळणे आदी कार्य या संस्थेमार्फत करण्यात येणार आहेत.

विदर्भ व मराठवाडा विभागातील दुग्ध विकासाला चालना देण्यासाठी व शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी शासनाने विदर्भ व मराठवाडयातील ११ जिल्ह्यात दुग्ध विकास प्रकल्प टप्पा - १ राबविला होता. या काळात,



दैनिक दूधसंकलन वाढ –

**५५००० लिटरवरुन ३ लाख लिटर**

दूध दरातील वाढ –

**रु. १८ वरुन रु. ३०-३५ प्रती लिटर**

रोजगार निर्मिती - **१० हजार**

पहिल्या टप्प्यातील वरील अनुभव विचारात घेऊन विदर्भ आणि मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये विदर्भ व मराठवाडा दुग्ध विकास प्रकल्प टप्पा- २ राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

**दुसऱ्या टप्प्याचे स्वरुप व व्याप्ती :-**

- विदर्भ व मराठवाडयातील सर्व गावे
- कालावधी - ३ वर्षे
- प्रकल्प किंमत - रु १४९.२७ कोटी **असून**, त्याअंतर्गत एकूण रु १४९.२७ कोटी तरतूद असून, त्याअंतर्गत रु. ५०.०० लक्ष इतका निधी उपलब्ध झाला आहे. याद्वारे, दुधाळ जनावरांचे वाटप, चाफ कटरचा पुरवठा, शेतकरी प्रशिक्षण, दर्जेदार चारा व सायलेजचा पुरवठा, वंध्यत्व निवारण शिबिरे, उच्च जनुकीय गुणवत्तेच्या गाभण गायींचा पुरवठा आदी कार्य पार पाडली जाणार आहेत.

राज्यामध्ये ET / IVF साठीच्या ६ प्रयोगशाळा लवकरच कार्यान्वित करण्यात येणार आहेत. याद्वारे उच्चवंशावळीच्या देशी व संकरित कालवडी क्षेत्रीय स्तरावर तयार होण्यास मदत होऊन गुणात्मक पशुधनाच्या संख्येत वाढ होणार आहे. राज्यात २१ वी पशुगणना २५ नोव्हेंबर २०२४ ते मार्च २०२५ या कालावधी पूर्ण करण्यात आली.

राज्यामध्ये पशुवैद्यकीय सेवांचा दर्जा व व्याप्ती वाढविण्यासाठी महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगामार्फत पशुधन विकास अधिकारी (गट-अ) या संवर्गाची एकूण २७९५ व सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन या संवर्गाची ३११ पदे भरण्यात येणार आहेत. विभागाच्या इतिहासात प्रथमत:च एवढ्या मोठ्या प्रमाणावर भरती होणार आहे. पशुवैद्यकीय सेवांची उपलब्धता सर्वसामान्य पशुपाशकाला सहजपणे व्हावी, विभागाचे प्रशासकीय कार्यान्वयन अधिक लोकाभिमुख व गतिमान व्हावे, यासाठी विभागाच्या पुनर्रचनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. ५६१ पशुधन विकास अधिकारी व ६१ सहाय्यक आयुक्तांच्या समुपदेशनाद्वारे बदल्या करुन या ऐतिहासिक निर्णयाची यशस्वी अंमलबजावणी करण्यात आली आहे.

**नाविन्यपूर्ण उपक्रम:** विभागांतर्गत लम्पी चर्मरोग प्रतिबंधात्मक लस निर्मीती करण्यात येत आहे. झुनोटीक रोगाच्या अचुक व तत्पर निदानासाठी पश्चिमी राज्यांकरीता बीएसएल-२ व बीएसएल-३ प्रयोगशाळेच्या नवीन इमारतीत कार्यान्वयन करण्यात आले आहे. गाई-म्हशींमध्ये कृत्रिम रेतन कार्यक्रमासाठी लिंगनिदान केलेल्या वीर्यमात्रा (Sex Sorted Semen) वापर करून उच्च वंशावळीच्या कालवडी / पारड्यांची निर्मिती करण्याचे धोरण प्रभावीपणे राबविण्यास पशुसंवर्धन विभागाने सुरुवात केली आहे. त्यानुषंगाने राज्यातील ६ महसुली विभागात भ्रुण प्रत्यारोपण प्रयोगशाळांची स्थापना करण्यात आली आहे.



**पशुसंवर्धन विभागाची भविष्यातील उद्दिष्टे :**

- राज्यामध्ये ग्रामीण उद्योजकता विकास कार्यक्रम राबविणे
- Vision-२०४७ Documents तयार करणे.
- पशुसंवर्धनाच्या व्यवसायाला कृषीचा दर्जा देणे.
- पुनर्रचनेनुसार सर्व पदांची भरती व पदोन्नती करणे
- सर्व पवैद संस्थांचे पायाभूत बळकटीकरण करणे.
- One Health Programme: Zoonotic diseases eradication.




महाराष्ट्र शासन
पशुसंवर्धन विभाग
पशुधन हिताय: बहुजन सुखाय:
भूमि आणि जनावरें। हींच उत्पत्तीचीं कोठारें।
एकाचीं अनेक होतीं खिल्लारें। जोडधंदा हा घरोघरीं॥
घरोघरीं दूधदुभतें। अन्नधान्यासि सहायक तें।
आबालवृध्द होतील। सशक्त आणि निरोगी॥
-राष्ट्रसंत तुकडोजी महाराज



# वीजांपासून पशुधनाची हानी टाळण्यासाठी पशुपालकांनी करावयाच्या उपाययोजना



**डॉ. गणेश निटुरे**
पशुधन विकास अधिकारी
तालुका लघु पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, रेणापूर,
जि. लातूर

राज्यात सध्या अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्यांचा जोर वाढला आहे, ज्यामुळे वीज पडण्याच्या घटना वाढत आहेत. मान्सून सक्रिय होण्याच्या एक महिना अगोदर अवकाळी आणि पुर्वमौसमी पावसाच्या काळात वीज कोसळण्याचे प्रमाण सर्वाधिक असते. याच कालावधीत शेतीतील मशागतीचे कामे होत असल्याने पशुधन मृत्यूमुखी पडण्याचा धोका वाढतो. भारतामध्ये महाराष्ट्रात वीज पडून मृत्यूमुखी पडण्याचे प्रमाण सर्वाधिक आहे. विशेषतः मराठवाडा आणि विदर्भातील भौगोलिक रचना, कमी वृक्षसंख्या आणि हवामानातील बदलांमुळे या भागात वीज पडण्याचा धोका अधिक आहे व सर्वाधिक मृत्यू याच भागात दिसून येतात. वीजांमुळे पशुधन, शेतकरी आणि मालमत्तेचे मोठे नुकसान होते.

### वीज पडण्याची कारणे:

- **विद्युत भार:** ढगांमधील पाण्याच्या थेंबांचे व बर्फाच्या कणांचे घर्षण सकारात्मक - नकारात्मक विद्युत भार निर्माण करते.
- **विद्युत क्षेत्र:** ढग आणि जमीन यांच्यातील विद्युत भाराचे अंतर वाढल्याने प्रबळ विद्युत क्षेत्र तयार होते.
- **तापमान आणि आर्द्रता:** उष्ण आणि दमट हवामान ढगांची जलद निर्मिती करते, ज्यामुळे विद्युत भार वाढतो.
- **भौगोलिक घटक:** उंच झाडे, पर्वत किंवा धातूच्या वस्तू वीज आकर्षित करतात.



पशुपालकांनी वीज पडण्यापासून पशुधनाचे रक्षण करण्यासाठी खालील उपायांचा अवलंब करावा:

**सुरक्षित आश्रय:**

- जनावरांना मोकळ्या जागेत बांधू नये. गोठा, शेड किंवा मजबूत इमारतीत पशुधनास ठेवावे.
- पावसाचे वातावरण आणि विजेचा कडकडाट होत असल्यास शेतातील कामकाज त्वरित थांबवून जनावरांना बंदिस्त आणि सुरक्षित ठिकाणी हलवावे.
- गोठ्यातील छत आणि भिंती धातूच्या नसाव्यात, कारण धातू वीज आकर्षित करतात.
- अचानक आलेल्या वादळाच्या वेळी जर तुमचे केस उभे राहत असतील किंवा त्वचेला मुंग्या येत असतील तर तुमच्यावर वीज कोसळण्याची शक्यता आहे. स्वतःचे रक्षण करण्यासाठी तात्काळ जमिनीवर पाय गुडघ्यात दुमडून एकमेकांना जोडावे, त्याभोवती हातांचा विळखा घालावा व हनुवटी गुडघ्यावर दाबून धरावी. जनावरांना खाली बसवावे. वातावरण निवळल्यानंतर तात्काळ आश्रयस्थान गाठावे.
- अचानक आकाशात कडकडाट झाल्यास व सभोवताली फक्त झाडेच असतील तर अशावेळी झाडाच्या उंचीच्या दुप्पट अंतरावर जमिनीवर वाकून बसावे.
- जनावरे पाण्यात असतील तर तात्काळ बाहेर काढा.

**स्थानिक हवामानाकडे लक्ष देणे:**

- हवामान खात्याच्या सूचनाकडे लक्ष द्यावे.
- दामिनी ॲप: भारतीय उष्णदेशीय मौसम विज्ञान संस्था पुणे (IITM) व भारतीय हवामान विभागाने विकसित केलेले 'दामिनी वीज चेतावणी ॲप' डाउनलोड करावे व त्याद्वारे परिसरातील हवामानाचा व वीज पडण्याचा अंदाज घ्यावा.
- वादळी वारे किंवा वीज पडण्याची शक्यता असल्यास जनावरांना गोठ्यातच ठेवावे.

**वीज सुवाहकांपासून सावधगिरी:**

- गोठ्यातील लोखंडी पत्रे, वीजवाहक तारा / विद्युत उपकरणांना स्पर्श टाळावा.
- गोठ्यातील वीज कनेक्शन, विद्युत आर्थींग योग्य व सुरक्षित असल्याची खात्री करावी.
- आकाशात गडद काळे ढग जमून कडकडाट होत असल्यास गोठ्यातील कुठलेही विद्युत उपकरणे चालू करू नये.
- पशुधनाचे गोठे, कडबाकुट्टी यंत्र व गोठ्यातील इतर विजेचे साहित्य योग्यरीत्या आर्थींग केलेली असावीत. आर्थींग वीजेला जमिनीत सुरक्षित मार्ग दाखवते, ज्यामुळे जनावरांवर परिणाम होण्याची शक्यता कमी होते.
- धातूच्या वस्तू (लोखंडी साधने) जनावरांजवळ ठेवू नयेत.
- शेतात काम करणाऱ्यांनी धातूच्या वस्तू जसे कुऱ्हाड, कोयते, छत्री तात्काळ लांब टाकावेत.
- धातूची पाणीपात्रे उंच ठिकाणी किंवा मैदानातील खुल्या जागी ठेवू नये, ज्यामुळे वीज आकर्षित होण्याची शक्यता वाढते.

**तांत्रिक उपाय:**

- गोठ्यांवर वीजरोधक यंत्रणा (लाइटनिंग अरेस्टर) बसवावी.
- स्वयंचलित तापमान व आर्द्रता नियंत्रण प्रणाली वापरावी.



❖ **जनावरांचे व्यवस्थापन:**

- गडगडाटाने जनावरांना घाबरण्यापासून रोखण्यासाठी त्यांना प्रेमळ वागणूक देवून शांत करा.
- गोठ्यात योग्य तापमान आणि आर्द्रता राखण्यासाठी फॅन किंवा फॉगरचा वापर करावा.
- जनावरांना पाणी आणि खनिज मिश्रणासह संतुलित आहार द्यावा.

❖ **इतर सुरक्षितता उपाय:**

❑ **झाडाखाली आश्रय टाळा:** उंच झाडे वीज आकर्षित करतात. त्यामुळे वीज पडण्याचा धोका असताना झाडाखाली स्वतः थांबू नये व जनावरांना बांधू नये.

❑ लक्षात ठेवा पावसामुळे तुमचं मृत्यू होणार नाही. पण झाडाखाली पावसाने भिजू नये म्हणून थांबत असाल, तर संकट तुमच्यावर ओढवू शकते.

❑ शेतामध्ये काम करत असताल तर स्वत:सह जनावरांचे विद्युत तारांपासूनचे अंतर किमान ५० फुट राहिल, असे नियोजन करावे.

❑ बैलांना तात्काळ लोखंडी जू पासून वेगळे करा.

❑ **आपत्कालीन उपचार:** जर जनावरावर वीज पडली, तर त्वरित पशुवैद्यकीय मदत घ्यावी.

❑ **जनजागृती:** पशुपालकांना वीज पडण्याचे धोके आणि बचाव उपायांबाबत माहिती द्यावी.

**नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या नुकसानीसाठी मदत:** नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित होणाऱ्या आपदग्रस्त व्यक्तींना केंद्र व राज्य आपत्ती प्रतिसाद निधी मधून मदत दिली जाते. जर वीज पडून जनावर मृत्यूमुखी पडल्यास अल्प व अत्यल्पभूधारक व भूमिहीन पशुपालकांना वेळोवेळी निर्गमित शासन निर्णयानुसार मदत केली जाते. याकरिता मृत जनावराचा तलाठी यांचा पंचनामा, पशुवैद्यकीय अधिकारी यांचे शवविच्छेदन अहवाल व इतर आवश्यक कागदपत्रे महसूल विभागाकडे जमा करावीत.



# भ्रुणप्रत्यारोपण तंत्रज्ञान



सर्वाधिक दूध उत्पादन करणारा देश म्हणून आपल्या भारत देशाचा जगात प्रथम क्रमांक लागतो. पशुसंवर्धन विभागातील पैदास धोरण व या क्षेत्रातील पशुवैद्यक व पशुपालक यांनी उत्पादन वाढीसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा केलेला वापर व नवनवीन प्रयोग या बाबींमुळेच भारताने दुग्धोत्पादनात असलेला प्रथम क्रमाक २५ वर्षापेक्षा जास्त कालावधीपासून सातत्याने टीकवून ठेवला आहे, ही एक अभिमानास्पद बाब आहे.



**डॉ.विष्णु जवणे**
राज्य समन्वयक अधिकारी, भ्रुणप्रत्यारोपण प्रयोगशाळा,
महाराष्ट्र शासन, वळूमाता प्रक्षेत्र, ताथवडे, पुणे-३३

**आपल्या देशातील गावठी गाय प्रती दिन सरासरी २.८७ कि.ग्रॅ, देशी गाय प्रती दिन सरासरी ४.१७, संकरीत गाय ६.७६ व विदेशी गाय सरासरी ११.४२ कि.ग्रॅ दूध देत असल्याचे सर्वेक्षणात दिसून आले आहे. हे प्रमाण इतर विकसित देशात सरासरी २४ कि.ग्रॅ पेक्षा जास्त आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे देशी व गावठी पशुधनाची कमी उत्पादनक्षमता, वंध्यत्व व इतर प्रजनन अकार्यक्षमतेमुळे दोन वेतात वाढलेले अंतर असून, यामुळे दुग्धोत्पादनाचा खर्च वाढत आहे.**

पशुवैद्यक विविध उपाययोजना करून दोन वेतातील वाढलेले अंतर कमी करण्याचा प्रयत्न करतच आहे; परंतु त्याबरोबरच प्रती पशु दूध उत्पादन वाढीसाठी विविध योजनांच्या माध्मातून नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून अनुवंशिक सुधारणा करण्यासाठीसुद्धा प्रयत्नशील आहे. याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्र शासनाने प्रत्येक महसुली ... विभागात महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, नागपुर अंतर्गत प्रत्येक महसुली विभागात एक भ्रुणप्रत्यारोपण प्रयोगशाळा स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यापैकी एक भ्रुण प्रत्यारोपण प्रयोगशाळा, शासकीय पशुपैदास प्रक्षेत्र, ताथवडे, पुणे येथे कार्यान्वित करण्यात आली आहे.

प्रजनन क्षेत्रातील एक अत्याधुनिक तंत्रज्ञान म्हणून भ्रुणप्रत्यारोपण तंत्रज्ञानाकडे पाहिले जाते. याचा वापर कमी दूध उत्पादन असलेल्या पशुधनापासून उच्च उत्पादन क्षमता असलेल्या वासराच्या जन्मासाठी केला जात आहे. यामुळे दुग्धव्यवसायात फार मोठी क्रांती घडून येणार आहे. या तंत्रज्ञानाच्या सहाय्याने उच्च वंशावळ असणाऱ्या गाईच्या स्त्रीबीज कोषातून स्त्रीबीज एका विशिष्ट सोनोग्राफी अवजराच्या सहाय्याने बाहेर काढून सदरचे स्त्रीबीज प्रयोगशाळेत आपल्याला पाहीजे त्या वळुच्या विर्याच्या सहाय्याने फलित केले जाते व तयार होणारे भ्रुण 'दायी गाई/म्हशी' च्या गर्भाशयात प्रत्यारोपीत केले जातात. सर्वसाधारणपणे नैसर्गिकदृष्टया एका गाई / म्हैशीपासून एका वर्षात एक वासरू निर्माण करू शकतो, परंतु या तंत्रज्ञानाच्या सहाय्याने उच्च अनुवंशिक गुणधर्म असणाऱ्या एकाच गाईपासून दायी गाईंच्या मदतीने एका वर्षात ४०-५०

उच्च वंशावळ असणाऱ्या वासरांची निर्मिती करणे शक्य होते. या तंत्रज्ञानाचा वापर करून आपण वयात आलेल्या कालवडी, वयोवृध्द गाय-म्हैस, अपंग गाय-म्हैस, कायमस्वरूपी किंवा तात्पुरत्या स्वरूपात वंध्यत्व असलेल्या गाय-म्हशीमधूनही स्त्रीबीज संकलित करून त्यांच्यापासून चांगल्या प्रकारचे भ्रुण तयार करू शकतो.

लिंग निर्धारीत विर्यमात्रांचा वापर करून ९० टक्क्यांपर्यंत फक्त कालवडीचीसुध्दा पैदास करणे व त्यामुळे लिंग निर्धारीत विर्याचा योग्य व पुर्ण कार्यक्षमतेने वापर करणे शक्य आहे. ज्यामुळे दुग्धव्यवसाय करणाऱ्या पशुपालकांना विनाकारण नर वासरे जोपसण्याचा खर्च कमी करता येऊ शकेल. उच्च गुणधर्म असणाऱ्या विविध वळुंची निवड करत असताना राबवण्यात येणाऱ्या पैदास चाचणी कार्यक्रमाचा कालावधी कमी करणे शक्य होणार आहे.

दाता गाई / म्हैशींची निवड करताना, शुध्द वंशावळ, रोगप्रतिकारक शक्ती, दुधातील स्निगधांश, दूध देण्याचा कालावधी, दूध उत्पादन क्षमता व वातावरणाशी जुळवून घेण्याची क्षमता इ. गुणधर्मांच्या आधारे निवड केली जाते. दाई गाई / म्हैस म्हणून कोणत्याही जातीच्या अथवा गावठी (Non Discript) जनावरांचा वापर केला जाऊ शकतो. ज्यामुळे गोठ्यातील कमी दूध देणाऱ्या गाय-म्हैशींपासून उच्च अनुवंशिक गुणधर्म असणाऱ्या वासरांची पैदास करून भविष्यात प्रती जनावर दूध उत्पादन वाढवणे शक्य होणार आहे. या तंत्रानाचा वापर आता विविध गोशाळेतील प्रजननक्षम पशुधनात करुन सदर गोशाळेत उच्च उत्पादनक्षम वासरांची निर्मिती करण्यासाठी पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासन काम करत आहे.


आपल्या देशात जैविक विविधतेमुळे वेगवेगळया वातावरणात वाढलेल्या उच्च उत्पादन असलेल्या विविध जातीच्या जनावरांचा या तंत्रज्ञानात समावेश झाल्यास नक्कीच प्रती पशुधन दूध उत्पादन वाढवून उत्पादन खर्च कमी करण्यास व पशुपालकाचा दुग्धव्यवासाय फायदेशीर होण्यास मदत होणार आहे.

पशुप्रजनन नोंदीची संकल्पना।
वाढवेल गायी-म्हशींची गर्भधारणा॥

स्त्रीबीज संकलन प्रक्रीया




प्रयोगशाळेत तयार झालेले भ्रुण



भ्रुणप्रत्यारोपण तंत्रज्ञानाच्या मदतीने जन्मलेली वासरे



# ब्रुसेल्लोसीस (Brucellosis): लसीकरण हाच नियंत्रणाचा राजमार्ग






**डॉ. शुभा देशमुख**
सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन,
प.सं. १२, पशुसंवर्धन आयुक्तालय,
औंध, पुणे-६७

ब्रुसेल्लोसीस (Brucellosis) म्हणजेच ज्याला आपण सांसर्गिक गर्भपात असे म्हणतो. हा आजार गाय, म्हैस, शेळी, मेंढी, वराह, अश्व, कुत्री व काही वन्य प्राण्यांमध्ये आढळणारा जिवाणूजन्य आजार आहे. Brucellosis जीवाणूच्या साधारणत: Brucella abortus, Brucella melitensis, Brucella suis, Brucella canis अश्या वेगवेगळ्या प्रजाती आढळून येतात. विशेष म्हणजे ह्या रोगाचा प्रसार प्राण्यांपासून मानवास होत असल्याने (झुनोटीक) ह्या आजाराच्या प्रसाराचे नियंत्रण करणे हे सामुहिक आरोग्याच्या दृष्टीनेदेखील महत्वाचे आहे.

ब्रुसेल्लोसीस (Brucellosis) या रोगातील विशेष लक्षण म्हणजे जनावरांच्या (मुख्यत्वे करून गायवर्ग व म्हैसवर्ग) ७-९ महिन्यांच्या गर्भधारणा काळात होणारा गर्भपात होय. गर्भधारणेच्या शेवटच्या टप्प्यात होणाऱ्या गर्भपातामुळे जनावरांचा भविष्यात अपेक्षित असलेले दूध उत्पादन तर मिळत नाहीच; पण जनावर पुन्हा दुधउत्पादनास योग्य होईपर्यंत त्याचा कुठलाही उपयोग होत नाही. तसेच, गाभणकाळात जनावरांच्या विशेष देखभालीवर होणारा खर्चाचा पशुपालकांवर अतिरिक्त भार निर्माण होतो. त्याचप्रमाणे आजतागायत हा रोग बरा होण्यासाठी पशूंमध्ये कुठलेही शाश्वत प्रतीजैवक औषधोपचार उपलब्ध नसल्याने, जनावरांचे ठराविक वयात (४-८ महिने) प्रतिबंधात्मक लसीकरण करून घेणे हाच एकमेव राजमार्ग आहे.

**पशूंमधील प्रसार:**

- हा जीवाणू गाभण जनावरांच्या गर्भाशयामध्ये स्थिरावतो व त्याचे कारण म्हणजे "इरीथ्रीटॉल" नावाची एक विशिष्ट प्रकारची साखर गर्भाच्या पेशीमध्ये निर्माण होत असते.
- जीवाणूच्या वाढीसाठी "इरीथ्रीटॉल" पोषक असते. त्यामुळे ह्या जीवाणूचा संसर्ग गाभण जनावरांना होतो.
- मृत वासरू, गर्भ वार / जार यांच्या संपर्कात आल्यास.
- इतर बाधित जनावराच्या संपर्कात आल्यास, दुषित हवेच्या माध्यमातून दुसऱ्या जनावरास प्रसार होतो.
- बाधित रेडा आणि बैलांच्या नैसर्गिक संयोगाद्वारे अनुक्रमे म्हैस आणि गायींमध्ये झाल्याचे दिसून येते.

**पशूंमधील लक्षणे:**

- ७-९ महिन्यांच्या गर्भधारणा काळात होणारा सांसर्गिक गर्भपात व तद्नंतर स्तनदाह.
- दूध उत्पादनात होणारी घट.
- वंध्यत्व.
- योनीमार्गातून पांढरा, चिकट स्राव येणे.
- सांध्यावर सूज येणे.

**ह्या आजाराच्या लक्षणांमध्ये साधर्म्य असलेले इतर आजार:**

ब्रुसेल्लोसीस आजारामध्ये प्रामुख्याने आढळून येणारी लक्षणे ही खालीलप्रमाणे इतर आजारातही आढळून येतात तथापि, ...




गर्भधारणा काळात गर्भपात होण्याचा कालावधी प्रत्येक आजारात वेगवेगळा आहे.

- **ट्रायकोमोनीयासीस** (२-४ महिने )
- **व्हायब्रीयोसीस** (५-६ महिने )
- **मायकोटिक गर्भपात** (२-७ महिने )
- **लेप्टोस्पायरोसिस** (६ महिन्यांच्या पुढे)

सध्या देशात केंद्र शासनाच्या राष्ट्रीय पशु रोग नियंत्रण कार्यक्रमातंर्गत बृसेल्लोसीस या रोगासाठी प्रतिबंधात्मक लसीकरण मोहीम राबविण्यात येत आहे. रोगाच्या नियंत्रणासाठी प्राथमिक मुलभूत बाब म्हणजे ह्या आजाराविषयी जनजागृती होय. बऱ्याचदा गाभण जनावर उलटल्यानंतर आजाराच्या शाश्वत निदानाकरिता तपासण्या केल्या जात नाही. त्यानंतरच्या काळात या आजारामुळे गर्भधारणा राहिली नाही तर जनावरांचे वंध्यत्व निवारणाचे उपचार केले जातात आणि तरीही गर्भधारणा राहिली नाही तर पशुपालक हताश होऊन ते जनावर विकून टाकतो. याला कारण म्हणजे या रोगाविषयी पशुपालकामधे पुरेशी जागृती नसणे हे होय. या रोगाचे नियंत्रणाचा मार्ग अत्यंत सोपा आहे आणि ह्या मार्गातील विविध टप्पे खालीलप्रमाणे आहेत.

- गोवर्गीय व म्हैसवर्गीय ४-८ महिने वयाच्या फक्त मादी वासरांचे लसीकरण करून घ्यावे. ही लस एकदा दिल्यावर दरवर्षी लसीकरण करावयाची गरज नाही.
- पशुवैद्यकीय दवाखान्यात लस उपलब्ध करून देण्यात येते.
- शाश्वत निदानासाठी नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यात जाऊन पशुवैद्यकामार्फत दोन प्रकारे नमुने गोळा करू शकतो. एक म्हणजे संशयित बाधित जनावराचे रक्तजल किंवा योनी भागातून येणारा पांढऱ्या रंगाचा स्त्राव किंवा दूध ह्यापैकी कुठलेही एक किंवा उपलब्ध होतील, तशा प्रकारच्या नमुन्यांच्या चाचण्या करून आणि दुसरे म्हणजे गर्भपात झाल्यानंतर, मृत गर्भाचे फुप्फुसे किंवा गर्भाशयातील स्त्राव किंवा गर्भाचा वार इ. नमुने चाचणीकरिता सादर करू शकतो.
- सदर नमुने हे विभागीय रोग निदान प्रयोगशाळा तसेच पुणे स्थित रोग अन्वेषण प्रयोगशाळा, औंध ह्या संस्थेत शाश्वत निदानासाठी पाठविले जातात.
- केंद्र शासनामार्फतही **राष्ट्रीय पशु रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत** ब्रुसेल्लोसीस नियंत्रण कार्यक्रमांतर्गत संभाव्य आजार लवकर ओळखण्यासाठी गावस्तरावर काही पशुंचे नमुने यादृच्छिक पद्धतीने संकलित करून **स्क्रीनिंग चाचणी** केल्या जाते.
- हा आजार प्राण्यांपासून मानवास होत असल्याने, ह्या रोगाचा प्रसार नियंत्रित करणे मानवी आरोग्याच्या दृष्टीनेही तेव्हढेच महत्वाचे आहे. त्यामुळे मृत गर्भाची विल्हेवाट शास्त्रीय पद्धतीने लावणे फार महत्वाचे आहे. या आजाराचा जीवाणू साधारणत: दोन महिने बाहेरच्या वातावरणात जिवंत राहतो. अशावेळी मानवाच्या व इतर प्राण्यांच्या संपर्कात जीवाणू आल्यास त्यांना संसर्ग होण्याची शक्यता असते.

- मृत गर्भाची विल्हेवाट लावताना गर्भ आणि गर्भाची वार हाताळणाऱ्या व्यक्तीने गर्भ व गर्भाची वार ह्यासोबत प्रत्यक्ष संपर्कात येऊ नये. गर्भ व गर्भाची वार हाताळताना ग्लोव्हज आणि मास्कचा वापर करावा. गर्भ व गर्भाची वार जमिनीत ४-५ फूट खोल खड्डा करुन पुरून टाकावी. आसपास नदी, विहीर किंवा सार्वजनिक पाणवठा असेल अशा जागा पुरण्याकरीता टाळ्याव्यात. वापरण्यात आलेले ग्लोव्हज आणि मास्क सुद्धा पुरण्यात यावे. तद्नंतर गोठ्याचे निर्जंतुकीकरण करून गोठ्यातील कचरा, निरुपयोगी उर्वरित चारा इ. जाळून टाकावे.
- जनावरांचे नमुने सकारात्मक आल्यास, अशा जनावरांचे कच्चे दूध सेवनास पूर्णपणे टाळावे तसेच अशा जनावरांचे इतर निरोगी जनावरांपासून विलगीकरण करून, त्यांची स्वतंत्र देखभाल करण्यात यावी व ह्या बाधित जनावरांचा पुनरुत्पादानासाठी वापर भविष्यात करण्यात येऊ नये.
- या रोगाचा मानवास होणारा संसर्ग लक्षात घेता, बाधित पशुधन हाताळणाऱ्या संबंधित पशुपालकाने आणि कुटुंबातील इतर सदस्यांनी सुद्धा ह्या रोगाच्या चाचण्या करून घ्याव्या व त्यानुसार डॉक्टरांच्या सल्ल्याने उपचार करून घ्यावेत.
- मानवामध्ये उपचाराअंती हा आजार बरा होऊ शकतो.
- जीवाणूची लागण एका जनावरापासून दुसऱ्या जनावरास होत राहते आणि जीवाणू वातावरणात संक्रमित होत असतो. हे चक्र कुठे तरी थांबणे आवश्यक आहे, त्यासाठी लसीकरण हा एक शाश्वत पर्याय आहे. सलग १०-१२ वर्षे लसीकरण केल्यास त्यावेळची सर्व जनावरे ब्रुसेल्लोसि रोगमुक्त असतील.

**मानवामधील प्रसार:**

- बाधित जनावराचे कच्चे दूध व त्यापासून निर्मित दुग्धजन्य पदार्थांचे सेवन केल्यास.
- बाधित जनावराच्या सभोवतालच्या वातावरणात जीवाणूच्या प्रसारामुळे दुषित हवेच्या माध्यमातून.
- बाधित जनावरांचे रक्त, मृत गर्भ, गर्भाची वार, योनीमार्गातील स्त्राव इ. च्या संपर्कात आल्यास.

**मानवामधील लक्षणे:**

- डोके दुखणे, स्नायू आणि हाडांमध्ये होणाऱ्या वेदना.
- ताप येणे, अंग दुखणे, अशक्तपणा व थकवा.
- अंडकोष, यकृत व प्लीहा तसेच मज्जासंस्थेवर सूज येणे इ.
- काही दिवसानंतर रोगाची लक्षणे दिसायची बंद होतात.




- नंतर काही दिवसांनी पुन्हा ताप उलटून येतो व त्यासोबत इतरही लक्षणे दिसू लागतात. त्यामुळेच ह्याला आलटून पालटून स्वरूपाचा ताप (Undulant Fever) असेही संबोधतात.
- अशी लक्षणे दिसल्यास आरोग्य विभागाशी संपर्क साधावा.

**ह्या आजाराची जोखीम कुणास आहे?**

- पशुपालक / शेतकरी.
- पशुवैद्यक.
- कत्तलखान्यातील जनावरे व मांस हाताळणारे व्यक्ती.
- प्रयोगशाळेत काम करणारे व्यक्ती.
- वन्य प्राण्यांचे तस्करी / व्यापार करणारे व्यक्ती.

मानवामध्ये उपचाराअंती हा रोग बरा होत असला तरी, जीवाणूचा प्रसार व प्रवास थांबविणे सामुहिक आरोग्याच्या दृष्टीने महत्वाचे आहे. त्यासाठी पशुपालकांनी ब्रुसेल्लोसीस लसीने ४-८ महिने वयाच्या मादी वासरांचे एकदाच (One Time Vaccination) लसीकरण करून घ्यावे. नर वासरांना ही लस देऊ नये. ह्या रोगाच्या नियंत्रणाच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन केल्यास, पशुमधील व मानवामधील संसर्गाचे नियंत्रण व अंतिमतः निर्मुलन शक्य होऊ शकेल .



# क्लोरॅन्ट्रानिलिप्रोलची जनावरांमधील विषबाधा



अगदी अलीकडेच नाशिक जिल्ह्यातील एका ठिकाणी दोन मोठ्या गोठ्यांमध्ये केवळ कणीस काढून मका वैरण दिल्यानंतर अनेक गाई आणि म्हशींचा मृत्यू झाल्याची घटना घडली. शासकीय आणि शास्त्रज्ञांच्या स्तरावर याच्या कारण मीमांसेचा मागोवा घेतला असता, या सर्व जनावरांना जो मका चारा म्हणून देण्यात आला होता त्याच्यावर त्या पिकाच्या वाढीच्या काळात क्लोरॅन्ट्रानिलिप्रोल (Chlorantraniprole) नामक कीडनाशक मोठ्या प्रमाणात फवारण्यात आले होते असे समजून आले. त्या कीडनाशकाचा अंश अधिक प्रमाणात त्या चाऱ्यामध्ये आल्यामुळे या जनावरांचा मृत्यू झाला असावा असा प्रथमदर्शी अंदाज काढण्यात आला. काय असते हे क्लोरॅन्ट्रानिलिप्रोल? त्याचा अधिक प्रमाणात प्राण्यांच्या खाण्यामध्ये आले तर त्याचे काय परिणाम होतात ? त्याचा हा लेखाजोखा...



**डॉ. सुनील देशपांडे**
पविअ (वर्ग-१), पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१
कुडाळ, ता. जावळी, जि.सातारा.
मो.क्र.९४२३८६५४५८

क्लोरॅन्ट्रानिलिप्रोलचे कूळ अँथ्रॅनिलिक डायमाइड्स नावाच्या कीडनाशकांच्या वर्गात समाविष्ट होणारे क्लोरॅन्ट्रानिलिप्रोल हे एक कीडनाशक हे पतंग आणि फुलपाखरू सुरवंट (अळ्या) नियंत्रित करते. हे काही बीटल आणि ॲफिड्स आणि स्पिटलबग्ससारख्या किड्यांनादेखील नियंत्रित करते. सन २००८ मध्ये पिकांवर कीडनाशक म्हणून वापरासाठी क्लोरान्ट्रानिलिप्रोलची प्रथम नोंदणी करण्यात आली.

**कशी होते विषबाधा?**

क्लोरान्ट्रानिलिप्रोलची विषबाधा विविध कारणांनी होऊ शकते. ते चुकून खाद्यात मिसळले गेल्याने, चुकून जनावराने चाटल्याने आणि वर नमूद केलेल्या घटनेप्रमाणे चुकून प्रमाणापेक्षा अधिक मात्रेत कीडनाशक म्हणून पिकांवर फवारले गेल्याने (जे पीक नंतर चारा म्हणून जनावरांना दिले गेले आणि त्यामुळे त्यांच्या ते खाण्यात आले) अशा घटनांमुळे त्याची विषबाधा होऊ शकते.

सामान्यतः दुधाळ जनावरे आणि इतर सस्तन प्राण्यांमध्ये या रसायनाची होणारी विषबाधा सामान्यतः कमी तीव्र परंतु दीर्घकालीन सेवनामुळे विषारी असल्याचे मानले जाते. बऱ्याचदा अपघाती किंवा जाणूनबुजून संपर्कात आल्याने मोठ्या समस्या उद्भवू शकतात. येथे हे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे की क्लोरॅन्ट्रानिलिप्रोलमुळे प्राण्यांमध्ये दीर्घकालीन हानी होण्याची अपेक्षा नसली तरी, कीडनाशकांच्या सुरक्षित हाताळणी पद्धतींचे पालन करणे आणि सेवनाचा संशय असल्यास कोणत्याही त्रासाच्या लक्षणांसाठी प्राण्यांचे बारकाईने निरीक्षण करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

**विषबाधेची लक्षणे:** क्लोरॅांट्रानिलिप्रोल विषबाधेत जनावर शांत शांत होणे, सुस्ती येणे, स्नायूंचा पक्षाघात होणे, श्वसन प्रक्रियेत बिघाड होणे व भूक कमी होणे यांचा समावेश असू शकतो.

तोंडातून लाळ गळणे आणि डोळे लालसर होणे अशीही लक्षणे या विषबाधेत दिसत असतात.

**उपचार आणि उतारा :** क्लोरॅंट्रानिलिप्रोल विषबाधेसाठी कोणताही विशिष्ट उतारा (antidote) अस्तित्वात नसला तरी, श्वसन प्रक्रियेस नियमित करण्यास समर्थन देणारी औषधे देणे आणि ब्रॅडीकार्डियासाठी ॲट्रोपिनसह लक्षण पूरक औषधोपचार आणि काळजी उपयुक्त ठरू शकते.

**विषबाधा कशी टाळावी?**

**सुरक्षित हाताळणी :** दुधाळ जनावरांमध्ये अपघाती संपर्क आणि सेवन टाळण्यासाठी क्लोरॅंट्रानिलिप्रोलची योग्य साठवणूक, हाताळणी आणि वापर करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

**देखरेख:** दुग्ध उत्पादकांनी त्यांच्या जनावरांवर विषारी घटकांचे सेवन झाल्यानंतर आजार किंवा त्रासाच्या कोणत्याही लक्षणांसाठी बारकाईने लक्ष ठेवले पाहिजे, विशेषतः जर त्यांना अपघाती विषबाधा झाल्याचा संशय असेल तर.

**पशुवैद्यकीय काळजी:** विषबाधेची लक्षणे आढळल्यास, सेवनाची व्याप्ती निश्चित करण्यासाठी आणि योग्य उपचार देण्यासाठी त्वरित पशुवैद्यकीय मदत घेणे महत्वाचे आहे.

**अवशेष मर्यादा:** मांस आणि दुधातील क्लोरॅंट्रानिलिप्रोलसाठी सहनशीलता पातळी (tolerance level) प्राणीजन्य उत्पादनांमधील अवशेष सुरक्षित मर्यादेत आहेत, याची खात्री करण्यासाठी ठरविण्यात येत आहे.

**चयापचय:** क्लोरॅंट्रानिलिप्रोल आणि त्याचे मेटाबोलाइट्स तुलनेने लवकर चयापचयित होतात आणि उत्सर्जित होतात, म्हणजेच प्राण्यांच्या उत्पादनांमधील अवशेष एक्सपोजर काढून टाकल्यानंतर कमी होतात.

**कमीत कमी मर्यादेत वापर:** कीडनाशके चारा पिके किंवा अन्य कुठल्याही पिकांवर वापरताना त्याचा कमीत कमी मर्यादेमध्ये वापर करणे आवश्यक आहे. म्हणजे त्याचे कमीत कमी अंश पिकांमध्ये उतरतील.

क्लोरॅंट्रानिलिप्रोल हे सामान्यतः सुरक्षित मानले जात असले तरी, दुधाळ जनावरांमध्ये होणारे त्याचे संभाव्य परिणाम तपासण्यासाठी संशोधन सुरू आहे.





लेखन
डॉ. दर्शन नितिन काकडे
पशुधन विकास अधिकारी
पशुवैद्यकीय दवाखाना लोणंद,
ता. खंडाळा, जि.सातारा
मो. ९२२१०८४३३४

# पशुसंवर्धन गीत

शतककोत्तर इतिहास घडवित यशस्वी मार्गक्रमण
एकजुटीने घडवून उद्याचे पशुधन पशुसंवर्धन....||धृ||

शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी
अनुवंश सुधार योजनेची ही महती
गावाच्या विकासाचे हेच नवे धोरण
कामधेनु दत्तक ग्राम योजना कारण
एकजुटीने घडवून उद्याचे पशुधन पशुसंवर्धन.....||१||

वाहेल दुधाची गंगा होता जातीवंत पशुधन
वळूंचे खच्चीकरण, १०० टक्के कृत्रिम रेतन
गाय होईल योग्य वेळी जनन अन गाभण
पशुवैद्यकाने करता वंधत्व निवारण
एकजुटीने घडवून उद्याचे पशुधन पशुसंवर्धन.....||२||

सुदृढ पशु राहण्याचे एक खात्रीचे साधन
गोचीड-गोमाश्या आणि जंत निर्मूलन
घातक रोगापासून मुक्ती लसीकरण कारण
उपचारापरी प्रतिबंध हेच व्यवस्थापन
एकजुटीने घडवून उद्याचे पशुधन पशुसंवर्धन......|३||


छायाचित्र स्रोत: इंटरनेट

# श्वेतक्रांतीची किमया भारी आर्थिक संपन्नता पशुपालकांच्या दारी




सांगली जिल्ह्यातील गावांमध्ये, वाडी-वस्तीवर दूध संकलन केंद्र नाही, अशी स्थिती शोधूनही सापडणार नाही. ग्रामीण भागातील पशुपालकांच्या अर्थार्जनाचे मुख्य अंग म्हणून दुग्धव्यवसायाकडे पाहिले जाते. जिल्ह्यात या व्यवसायातून दहा हजारांवर तरुणांना प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध झाला आहे. ज्याच्या गाडीला दुधाची किटली, त्याची समाजात पत निर्माण होते. महिन्याला येथील तरुण हजारो रुपयांची उलाढाल करतो. पशुपालनातूनच पशुखाद्य हा उद्योगही या भागात वाढला आहे. जिल्ह्यात दररोज १६ लाख लिटर दूध संकलन होत आहे. यातून दररोज साडेसहा कोटी रुपये थेट दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होतात. कौटुंबिक उदरनिर्वाहासोबतच मुलांचे शिक्षण, लग्न, आजारपण एवढेच नव्हे, तर अन्य विकासांतही दूध व्यवसाय हाच त्यांचा मुख्य आधार ठरतो. त्याविषयी...



**डॉ. अजयनाथ थोरे**
जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,
सांगली

सांगली जिल्ह्याचा गेल्या २० वर्षांचा इतिहास पाहता २००३-०४ चा दुष्काळ, नंतरची टंचाई परिस्थिती, महापूर, कोविडची जागतिक महामारी या सगळ्यातून तावून-सुलाखून बाहेर पडलेल्या सांगली जिल्ह्याला आतापर्यंत खरा आधार दिला, तो दुग्ध व्यवसायानेच. सन १९११ मध्ये वाळवा तालुक्यात पहिली सहकारी दूध संस्था सुरू झाली. त्यानंतर १९६० पासून देशात सहकारी तत्त्वावर दुग्धव्यवसाय सुरू झाला. जिल्ह्यातील एकूण पोषक वातावरण, वारणा प्रकल्प, आरफळ स्टोअरेज, कृष्णा-कोयना उपसा जलसिंचन प्रकल्प, टेंभू या मोठ्या पाटबंधारे प्रकल्पांसह ७ मध्यम पाटबंधारे, ६१ लघुसिंचन, २८ पाझर तलाव व १७५ कोल्हापुर पद्धतीच्या बंधाऱ्यामुळे पाण्याची सोय झाली. त्यामुळे त्यातून दुग्ध व्यवसायची वाढ होणे निश्चितच होते.

### दररोज १६ लाख लिटर दूध संकलन

जिल्ह्यात आजमितीला ७ सहकारी, १२ आंतरराज्य आणि खासगी १२ संघांमार्फत दूध संकलन होते. या माध्यमातून सर्व पशुपालकांनी जिल्ह्यातील सामाजिक आणि आर्थिक परिवर्तन घडवून आणले आहे. साधारणपणे सरासरी दररोज १६ लाख लिटर दुधाचे संकलन होते. गायीच्या दुधास सरासरी ३२ रुपये, तर म्हशीच्या दुधाला सरासरी ५० रुपये प्रतिलिटर भाव धरला, तर दररोज ६.५० कोटी रुपयांची उलाढाल या माध्यमातून होत असते. ७० टक्के गायींचे व ३० टक्के म्हशींचे दूध संकलन होते. यापुढील काळातही दुग्धव्यवसायात निश्चित वाढ पाहायला मिळणार आहे. अन्न व कृषी संघटनांच्या अहवालानुसार २०२६ पर्यंत देशाच्या दुग्धोत्पादनात ४९ टक्के वाढ होणार आहे.

### जिल्ह्यात १५३ पशुवैद्यकीय दवाखाने सज्ज

जिल्ह्यातील तरुण मंडळींनी या व्यवसायात रुची दाखवायला सुरुवात केली आहे. त्याला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड मिळाली, त्यांच्या कौशल्यवृद्धीसाठी प्रयत्न झाले, तर निश्चितच व्यावसायिक दृष्टिकोनातून या व्यवसायाकडे पाहिले जाईल. या सर्वांना सहाय्य करण्यासाठी शासनाचे जिल्ह्यात १५३ पशुवैद्यकीय दवाखाने आहेत. ८० ते ८५ टक्के दवाखाने सुसज्ज अशा स्वमालकीच्या इमारतीत आहेत. एकूण सिंचनाच्या सुविधा, पशुवैद्यकीय सेवा, संकलनासाठी असणारे दूध संघांचे जाळे, वाढलेल्या दळणवळणाची सुविधा विचारात घेतल्यास, तसेच पुणे-मुंबईसारख्या बाजारपेठेचा विचार केल्यास निश्चितच दूध उत्पादन वेगाने वाढेल.

### नवीन रोजगाराच्या संधी

एका अहवालानुसार देशात १.२ कोटी नवीन रोजगाराच्या संधी दुग्ध व्यवसायाच्या माध्यमातून निर्माण होतील. एकूणच, जगाच्या तुलनेत २३ टक्के दूध उत्पादन आपण घेतो. जागतिक दूध उत्पादन वाढीचा वेग १.८ टक्के असताना आपल्या देशात मात्र ५ टक्क्यांच्या वर आहे. आगामी काळात पशुसंवर्धन, संगोपनासह वाहतूक आणि पॅकेजिंग व्यवसायात मोठ्या प्रमाणात वाढ होणार आहे, याची नोंद आपल्याला घ्यावी लागेल. जिल्ह्याचा विचार केला तर निश्चितपणे एकूण पशुधन व प्रती जनावर दूध उत्पादनामध्ये वाढ होताना आढळते. त्यासाठी वेगवेगळ्या माध्यमातून पशुपालक, पशुसंवर्धन विभाग आणि दूध संघ प्रयत्न करत आहेत. ज्याचे अनुकूल दृश्य परिणाम आतापासूनच निदर्शनास येऊ लागले आहेत.






# मुक्त संचार गोठा



### २० लिटर दूध देणारी जनावरे

दुग्धव्यवसायाला व्यावसायिक स्वरूप आल्यामुळे उच्च प्रतीची जनावरे जोपासली जात आहेत. कमीत कमी १५ ते २० लिटर उत्पादन असणारी जनावरे गोठ्यात दिसतात. त्यासाठी आवश्यक उच्च प्रतीच्या लिंग वर्गीकृत रेतमात्रांचा वापरदेखील वाढताना दिसतोय. राज्यात ४० टक्के हिरवा व २० टक्के वाळलेल्या चाऱ्याची कमतरता आहे. वैरण, पशुखाद्यावरील ६५ ते ७० टक्के खर्च कमी करण्यासाठी चांगल्या वैरणीखालील क्षेत्रामध्ये वाढ अपेक्षित आहे. नवनवीन वैरणीचे प्रकार लागवडीखाली येत आहेत.

**मुक्त संचार गोठा:**

दूध उत्पादन हा व्यवसाय म्हणून केला जाईल, तेव्हा उच्च प्रतीच्या व्यवस्थापनामुळे आजारांचे प्रमाण कमी होईल. मिल्किंग मशीनचा वापर, मुक्त संचार गोठा, तसेच जैविक सुरक्षा याबाबत पशुपालकांना माहिती होत आहे. मुक्त संचार गोठा, जैविक सुरक्षा यामुळे कमी मनुष्यबळात हा व्यवसाय करण्याकडे कल वाढत आहे. दुग्धजन्य पदार्थांच्या मूल्यवर्धनामध्ये ४० टक्क्यां - पासून ४०० टक्क्यांपर्यंत नफा आहे. ही बाब हेरून तरुण मंडळी हा व्यवसाय करत आहेत. पशुपालक उत्पादन कंपनीच्या माध्यमातून सांगली जिल्हा, तालुकास्तरावर स्वतःचे ब्रँड निर्माण केले तर निश्चितच नफ्याचे प्रमाण वाढल्याशिवाय राहणार नाही.

**गायीच्या दुधासाठी ५६ कोटींचे अनुदान**

राज्यातील गाय दूध उत्पादन व खर्चाबाबत सुरू असलेल्या ससेहोलपटीच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने गायीच्या दुधासाठी जुन्या काळात ५, तर सुधारित नियमानुसार ७ रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेतला. यातून राज्य शासनाने शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे. शासनामार्फत ११ जानेवारी ते ३० सप्टेंबर २०२४ या काळात ५५.७९ कोटी रुपये अनुदान शेतकऱ्यांना दिले आहे. शेतकऱ्यांची महिनानिहाय संख्या १५५०० ते २०५०० अशी आहे. १ ऑक्टो ते ३० नोव्हेंबर २०२४ अखेर ३३.८२ कोटी रुपये अनुदान वितरीत करण्यात आले आहे.

### जिल्ह्यातील पशुधनाची संख्या

**मोठे पशुधन-** ................................ ६,६२,३८१

**लहान पशुधन-** .............................. १,५६,३७३

**एकूण पशुधन-** ............................... ८,१८,७५४

### तालुकानिहाय दूध संकलन (सरासरी) एप्रिल २०२४ ते मार्च २०२५

| तालुका | सहकार/मल्टिस्टेट | खासगी | एकूण |
|---|---|---|---|
| मिरज | ६०६६४ | १२९९५१ | १९०६१५ |
| कवठेमहांकाळ | ३७४५२ | ११३२६५ | १५०७१७ |
| जत | ६३९७० | ८८५४९ | १५२५१९ |
| तासगाव | ४५२२७ | १२२५०७ | १६७७३४ |
| खानापूर/विटा | १०५३१ | १३३०८१ | १४३६१२ |
| पलूस | १२२८१ | १३७६९९ | १५०५२३ |
| आटपाडी | २१४७४ | ११९५५८ | १४१०३२ |
| कडेगाव | ३४८५४ | ७३६४८ | १०८५०२ |
| वाळवा | १४३०७२ | १५१४९८ | २९४५७० |
| शिराळा | ५१०५४ | १२२८३८ | १७३८९२ |

(संदर्भ- जिल्हा दूग्ध व्यवसाय विकास अधिकारी, सांगली-मिरज)

### सांगली जिल्हा दूध संकलन (प्रती दिन)

| तपशील | संकलन |
|---|---|
| सहकार | २५३७७६ |
| मल्टिस्टेट | २१४८५१ |
| खासगी | ११६०५५८ |
| एकूण दूध | १६२९१८५ |

### सांगली जिल्हा दूध वितरण (प्रती दिन)

| तपशील | विक्री |
|---|---|
| पिशवीबंद दूध | ५४८२०७ |
| राज्यांतर्गत वितरण | ७०२७६७ |
| दूध भुकटीसाठी वापर | २७७३८१ |
| एकूण दूध | १६२९१८५ |
| दुग्धजन्य पदार्थांसाठी वापर | ९२२७९ |
| महानंद◦ वितरण | २८०३ |
| राज्याबाहेरील विक्री | ५७५० |
| एकूण वापर | १६,२९,१८७ |



# सुरभी चयन श्रंखला

## उच्च उत्पादनक्षम (HGM-High Genetic Merit) पशुधन निवड कार्यक्रम





**डॉ.राजु मुकूंदराव कोलते,**
सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन,
(नियोजन व अंदाज) पसं-६,
पशुसंवर्धन आयुक्तालय,
औंध, पुणे-६७

**सन १९९९ पासून भारताचा जगातील सर्वाधिक दूध उत्पादक देश** म्हणून गौरव होतो. भारतामध्ये २० पशुगणनेनुसार गाय वर्गाची संख्या १९३.४६ दशलक्ष आणि म्हैस वर्गाची संख्या १०९.८५ दशलक्ष आहे. जगातील सर्वात मोठी गोवंशीय पशुधनसंख्या भारतात आहे. गुरांमध्ये देशी / अवंशीय / गावठी जनावरे एकूण जनावरांच्या संख्येच्या ७३.४५% (१४२.११ दशलक्ष) आणि परदेशी / संकरित जनावरे २६.५% (५१.३६ दशलक्ष) आहेत. सुमारे ७० टक्के जनावरे गावठी प्रकारची आहेत, तर उर्वरित ३० टक्के जनावरे नोंदणीकृत देशी जातीची आहेत. दुग्ध उत्पादनात भारताचा जगात प्रथम क्रमांक असला तरी संख्यात्मक पशुधनापेक्षा गुणात्मक पशुधनाच्या संख्येत वाढ करणे येणाऱ्या काळात महत्वपूर्ण ठरणार आहे.

सीएचआरएसमध्ये मर्यादित जनावरांचा समावेश असलेली ४ केंद्रे भारतात आहेत. भारत सरकारने देशातील गोवंशीय संख्येच्या विकासासाठी अभिजात कळप राखण्याच्या उद्देशाने ७ केंद्रीय पशुप्रजनन फार्मची स्थापना केलेली आहे. सध्या देशात १७२ पशुप्रजनन फार्म असून, त्यात देशी जातींच्या उच्चभ्रू जनावरांच्या व्यवस्थापनासाठी १६५ राज्य पशुप्रजनन फार्म आहेत.

भारत सरकार आणि राष्ट्रीय कृषी अनुसंधान संस्थांनी सुरू केलेले संतती परीक्षण कार्यक्रम (PT-Progeny Testing Programme) आणि वंशावळ निवड कार्यक्रम (PS-Pedegree Selection Programme) देखील काही महत्वाच्या देशी जातींपुरता मर्यादित आहे आणि या कार्यक्रमांची व्याप्तीही काही राज्यांपुरती मर्यादित आहे. जसे की, महाराष्ट्र राज्यात वंशावळ निवड कार्यक्रमांतर्गत (PS-Pedegree Selection Programme) पंढरपुरी म्हैशीकरीता सोलापुर जिल्ह्यात व गवळाऊ गायीकरीता अमरावती, नागपुर व वर्धा जिल्ह्यात सदर कार्यक्रमाची अंमलबजावणी करणेत येत आहे.

या पार्श्वभूमीवर देशभरात उपलब्ध असलेल्या जास्त उत्पादन देणाऱ्या जनावरांची ओळख पटवून त्यांचा शोध घेणे आवश्यक असून, इतर शेतकरी / उद्योजक व इतर भागधारकांना उपलब्ध असलेल्या अधिक उत्पन्न देणाऱ्या जनावरांची यादी करणारी यंत्रणाही विकसित करण्याची गरज आहे. स्थानिक पशुवैद्यक

आणि राज्याचे पशुसंवर्धन विभाग उच्च वंशावळीच्या प्रजननक्षम व उत्पादनक्षम पशुधनाची ओळख आणि स्थान निश्चित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. जास्त दूध उत्पादन देणाऱ्या जनावरांची जनुकीय गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी जीनोमिक चाचणीसारख्या अद्यावत तंत्राचा वापर करुन किंवा जनावरांना **सुरभी चयन श्रंखला** (HGM-High Genetic Merit) पशुधन निवड कार्यक्रम) च्या कक्षेत आणले आहे.


छायाचित्र स्रोत: इंटरनेट

पुढील पिढीची संतती निर्माण करण्यासाठी वैज्ञानिक प्रजननासाठी जनावरांच्या निवडीचा आधार म्हणून काम करतात, ज्यामुळे दुधाची उत्पादकता वाढली असली तरी पशुपालकांना चांगला नफा मिळण्याची अपेक्षा आहे. राष्ट्रीय गोकुळ मिशन अंतर्गत राबविण्यात येणारे संतती परीक्षण (पीटी) आणि वंशावळ निवड (पीएस) कार्यक्रम हे गाय आणि म्हशींचे दूध उत्पादन, दूध रचना आणि पुनरुत्पादन पैलूंवरील पशुनिहाय विश्वासार्ह कामगिरी डेटाचा स्त्रोत आहेत. सध्याच्या आकडेवारीचा वापर वासरांच्या निवडीसाठी निवड कार्यक्रम आणि जीनोमिक निवडीच्या अंमलबजावणीमध्ये केला जातो. तथापि, पीटी / पीएस कार्यक्रमांना भौगोलिक प्रसारात त्यांची व्यावहारिक मर्यादा आहे. गोवंशाच्या विविध जातींसाठी मोठी संदर्भसूची उपलब्ध झाल्यास त्यांना जास्तीत जास्त फायदा होऊ शकतो.

**उच्च उत्पादनक्षम पशुधनाची ओळख :**

- गावभेटीदरम्यान ग्रामस्थांनी दिलेल्या माहितीच्या आधारे स्थानिक पशुवैद्यक/ पशुवैद्यकीय सहाय्यक/ पशुधन पर्यवेक्षक यांचेमार्फत उच्च उत्पादनक्षम पशुधनाची ओळख करणे.
- पशुधनाच्या निवडीसाठी राज्य शासनाने ठरवून दिलेल्या मानके व वैशिष्ट्यांच्या आधारे उत्कृष्ट दुध उत्पादक पशुधनाची निवड करणेत येईल.
- उच्च उत्पादनक्षम पशुधनाची संगोपनासाठी शेतकऱ्यांमध्ये जनजागृती व्हावी यासाठी गावातील इतर ग्रामस्थांसमोर जास्त उत्पादन देणाऱ्या / उच्च उत्पादनक्षम पशुधनाच्या दूध उत्पादनाची नोंद घ्यावी.
- उच्च उत्पादनक्षम पशुधनाची नोंदणी डेटा बेसवर आधीच न केल्यास भारत पशुधन प्रणालीवर नोंदणी करुन घेणे आवश्यक आहे.
- जनावरांच्या दूध उत्पादनाची माहिती अपलोड करण्याची सुविधा भारत पशुधन प्रणालीवर करण्यात आली आहे.
- स्थानिक पशुवैद्यक उच्च वंशावळीच्या पशुधनाचे फेनोटाइपिक वैशिष्ट्यदेखील लक्षात घेऊन ती वैशिष्ट्ये जातीच्या प्रकाराशी सुसंगत आहेत की नाही, वैशिष्ट्ये खरी नसल्यास पशुधनाला जातीचा श्रेणीबद्ध पशुधन म्हणून घेण्यात यावे.
- स्थानिक पशुवैद्यकांच्या कार्यक्षेत्रातील गोशाळा / गोसदन / पांजरापोळमध्ये उपलब्ध उच्च उत्पादनक्षम पशुधनाची ओळखून त्यांची माहिती भारत पशुधन प्रणालीवर अपलोड करणे.
- उच्च उत्पादनक्षम पशुधनाचे संगोपन करणाऱ्या शेतकऱ्याला सिध्द वळुच्या वीर्याच्या सहाय्याने सिध्द पशुधनाच्या प्रजननाच्या स्वरूपात प्रोत्साहन उपलब्ध करून देण्यात येईल व सिध्द पशुधनाचे प्रमाणीकरण, ओळखलेल्या उच्च उत्पादनक्षम पशुधनाच्या ऊतींचे नमुने घेऊन ते जीनोमिक चाचणीसाठी एनडीडीबीकडे पाठविले जावे.
- दूध उत्पादन स्पर्धेदरम्यान ओळखल्या गेलेल्या उच्च उत्पन्न देणाऱ्या / उच्च उत्पादनक्षम पशुधनाची स्थानिक पशुवैद्यकाद्वारे नोंदणी करावी आणि त्यांची माहिती भारत पशुधन प्रणालीवर अपलोड करावी.
- स्थानिक पशुवैद्यकाने आपल्या क्षेत्रात उपलब्ध असलेल्या उच्च वंशावळीच्या पशुधनाची यादी जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांच्याकडे पडताळणीसाठी सादर करावी.

**सुरभी चयन श्रंखला** (एचजीएम पशुधन निवड कार्यक्रम) चे उद्दीष्ट देशभरात गोवंशांच्या उच्चा वंशांवळीच्या पशुधनाच्या दूध उत्पादनाच्या नोंदी करणे. जलद उत्पादकता वाढीसाठी प्रयत्नांमध्ये आणखी सुधारणा करणे आणि शेवटी पशुधन मालकांची आर्थिक उन्नती करणे हे आहे.

## गोषवारा

- पशुसंवर्धन विभाग, केंद्र शासनामार्फत “सुरभी चयन श्रंखला” प्रकल्प सुरू करण्यात आला आहे.
- शेतकऱ्यांकडे उत्कृष्ट जर्मप्लाझम (जनुकीय संपदा) असलेल्या पशुंची ओळख करणे हे उद्दिष्ट आहे.
- उपक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे शेतकऱ्यांमध्ये उत्कृष्ट पशुधनाबाबत जागरूकता निर्माण करणे आणि त्यांच्या उत्पन्नात वाढ करणे.
- पशुवैद्यकीय अधिकारी / सहाय्यक किंवा पशुसंवर्धन सहाय्यक यांनी गावांमध्ये उच्च दूध उत्पादक पशुधनाची ओळख पटवावी.
- संबंधित राज्य सरकारने ठरविलेल्या निकषांनुसार आणि मानकांनुसार उत्कृष्ट जनावरांची निवड करावी.
- उच्च दूध उत्पादक पशुधनाचे दररोजचे दूध उत्पादन गावातील इतर शेतकऱ्यांसमोर नोंदवावे, यामुळे इतर शेतकऱ्यांमध्ये उत्कृष्ट पशुधनाच्या पालनाबाबत जागरुकता निर्माण होईल.
- निवडलेल्या उत्कृष्ट पशुधनाची "भारत पशुधन" प्रणालीमध्ये नोंद नसेल, तर त्याची नोंदणी करावी.
- नोंदणीकृत पशुधनाचीच दुध उत्पादनाची नोंद करावी / प्रथम Ownership हस्तांतरीत करुनच नोंद करावी.
- पशुवैद्यकीय अधिकारी यांनी उत्कृष्ट पशुधनाचे फेनोटाइपिक (बाह्य स्वरूपाशी संबंधित) विशेष लक्षणे नोंदवावीत; जेणेकरून त्या जनावराची जात खरी आहे का, हे तपासता येईल.
- PT/PS (Progeny Testing / Pedigree Selection) किंवा राष्ट्रीय दूध नोंदणी कार्यक्रम (NMRP) यासारख्या इतर प्रकल्पांत समाविष्ट पशुधनाची दूध नोंदणी "सुरभी चयन श्रंखला" प्रकल्पात करू नये.
- फक्त ज्या जनावरांचे दूध उत्पादन अधिक असून, त्यांची इतर कोणत्याही प्रकल्पांत नोंदणी नाही, अशा जनावरांनाच या प्रकल्पात समाविष्ट करावे.







❖ कृपया लक्षात घ्या की, एका पशुधनासाठी दूध उत्पादनाची नोंद भारत पशुधन प्रणालीमध्ये केवळ एकदाच करावयाची आहे.

# प्राणी क्लेश प्रतिबंधक कायदा १९६०

महाराष्ट्र शासनाने गाय, गायीची वासरे, वळू किंवा बैल या गोवंशीय प्राण्यांचे रक्षणासाठी व उत्पादक म्हशी तसेच रेडे यांचे कत्तलीस निर्बंध घालण्यासाठी महाराष्ट्र प्राणी रक्षण (सुधारणा) अधिनियम १९९५ दि. ४ मार्च २०१५ पासून राज्यात लागू केला आहे. त्यानुसार खालील प्राण्यांच्या कत्तलीस व कत्तल करण्यासाठी वाहतूक करण्यास कायदेशीर प्रतिबंध आहे.


छायाचित्र स्रोत: इंटरनेट

### सुधारीत कायद्यातील कलमे व शास्ती

- ५ अन्वये कोणतीही व्यक्ती राज्यातील कोणत्याही ठिकाणी कोणत्याही गायींची, वळूची किंवा बैलांची कत्तल करणार नाही किंवा कत्तल करविणार नाही.
- ५ अ (१) : कत्तल करण्यासाठी गाय, वळू किंवा बैल यांची वाहतूक करण्यास प्रतिबंध.
- ५ अ (२) : कत्तल करण्यासाठी गाय, वळू किंवा बैल यांची निर्यात करण्यास प्रतिबंध.
- ५ बः गाय, वळू किंवा बैल यांची अन्य कोणत्याही पद्धतीने विक्री, खरेदी करण्यास, विल्हेवाट लावण्यास प्रतिबंध.
- कलम ५, ५ (अ), ५ (ब) चा भंग केल्यास रु १०,०००/- दंड व ५ वर्ष कारावासाची शिक्षा.
- ५ (क): गाय, वळू, किंवा बैल यांचे मांस ताब्यात ठेवण्यास मनाई.
- ५ (ड) : महाराष्ट्र राज्याबाहेर कत्तल केलेली गाय, वळू, किंवा बैल यांचे मांस ताब्यात ठेवण्यास मनाई.
- **कलम ६:** अन्वये अनुत्पादक म्हशी आणि म्हशींची पारडे या प्राण्यांची सक्षम पशुवैद्यकामार्फत कत्तलपूर्व तपासणी न करता कत्तल करण्यास मनाई. (मान्यताप्राप्त कत्तलखान्याचे ठिकाणीच कत्तलीस परवानगी)
- कलम ५ (क), ५ (ड) ६ चा भंग केल्यास रु २०००/- दंड व १ वर्ष कारावासाची शिक्षा.

- कलम १० मध्ये नमुद केल्याप्रमाणे या अधिनियमातील सर्व अपराध हे दखलपात्र व बेजमानती (Non Bailable) असतील

सुधारीत कायद्यातील कलमे व शास्ती

- ५ अन्वये कोणतीही व्यक्ती राज्यातील कोणत्याही ठिकाणी कोणत्याही गायींची, वळूची किंवा बैलांची कत्तल करणार नाही किंवा कत्तल करविणार नाही.
- ५ अ (१) : कत्तल करण्यासाठी गाय, वळू किंवा बैल यांची वाहतूक करण्यास प्रतिबंध.
- ५ अ (२) : कत्तल करण्यासाठी गाय, वळू किंवा बैल यांची निर्यात करण्यास प्रतिबंध.
- ५ बः गाय, वळू किंवा बैल यांची अन्य कोणत्याही पद्धतीने विक्री, खरेदी करण्यास, विल्हेवाट लावण्यास प्रतिबंध.
- कलम ५, ५ (अ), ५ (ब) चा भंग केल्यास रु १०,०००/- दंड व ५ वर्ष कारावासाची शिक्षा.
- ५ (क): गाय, वळू, किंवा बैल यांचे मांस ताब्यात ठेवण्यास मनाई.
- ५ (ड) : महाराष्ट्र राज्याबाहेर कत्तल केलेली गाय, वळू, किंवा बैल यांचे मांस ताब्यात ठेवण्यास मनाई.
- **कलम ६:** अन्वये अनुत्पादक म्हशी आणि म्हशींची पारडे या प्राण्यांची सक्षम पशुवैद्यकामार्फत कत्तलपूर्व तपासणी न करता कत्तल करण्यास मनाई. (मान्यताप्राप्त कत्तलखान्याचे ठिकाणीच कत्तलीस परवानगी)
- कलम ५ (क), ५ (ड) ६ चा भंग केल्यास रु २०००/- दंड व १ वर्ष कारावासाची शिक्षा.
- कलम १० मध्ये नमुद केल्याप्रमाणे या अधिनियमातील सर्व अपराध हे दखलपात्र व बेजमानती (Non Bailable) असतील.
- गोवंशाची कत्तलीसाठी वाहतुक करण्यास तसेच गोवंशाचे मांस बाळगण्यास आणि वाहतुकीस प्रतिबंध
- शेतकऱ्यांना त्यांचे पशुधनाची वाहतुक करावयाची असल्यास त्यांनी वाहतुक करताना खालील प्रमाणपत्रे सोबत बाळगणे आवश्यक आहे.
- वाहतुक अधिनियम १९७८ मधील नियम ४७ अन्वये वाहतुक होणाऱ्या जनावरांचे वाहतुकीपुर्वी नजीकच्या पशुवैद्यकाचे स्वास्थ्य तपासणी प्रमाणपत्र
- सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, तालुका लघुपशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय / जिल्हा पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय यांचे वाहतुक अधिनियम २००१ मधील नियम ९६ अन्वये वाहतूक होणाऱ्या जनावरांचे वाहतूक प्रमाणपत्र.

- ❑ कत्तलीच्या उद्देशाने गोवंशीय जनावरांची किंवा मांसाची अवैध वाहतूक ज्या वाहनातून करण्यात येत असेल तर ते वाहन जप्त करता येईल.
- ❑ वाहतूक नियमा अंतर्गत अशा वाहनाचा परवाना तहकूब / रद्द करता येईल.
- ❑ न्यायालयीन चौकशी पूर्ण होईपर्यंत सदर जनावरे गोसदन, गोशाळा, पांजरपोळ किंवा प्राणी कल्याण संस्था यांचे स्वाधीन करण्यात येतील.
- ❑ न्यायालयाचे आदेशानुसार जोपर्यंत हे प्राणी या संस्थांचे अभिरक्षेत राहतील त्या कालावधीसाठी आरोपीवर त्यांच्या देखभालीसाठी येणाऱ्या खर्चाचे दायित्व असेल.

राज्यात महाराष्ट्र प्राणी रक्षण (सुधारणा) अधिनियम १९९५ तसेच प्राणी क्लेश प्रतिबंधक कायदा १९६० चे उल्लंघन होत असल्यास/ गोवंशाची कत्तल अथवा वाहतुक होत असल्याचे निर्दशनास आल्यास तत्काळ नजिकच्या पोलिस स्टेशन /पोलिस नियंत्रण कक्ष / पशुसंवर्धन विभागाच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

प्राणी क्लेश प्रतिबंधक कायदा १९६० अन्वये उपरोक्त कलमांचे उल्लंघन गुन्हा असून, यावर दंडात्मक तसेच कारावासाच्या शिक्षेची तरतूद आहे.

❋ अधिक माहीतीसाठी संपर्क ❋

विभागाचा टोल फ्रि नं.: १८०० २३३ ०४१८

आयुक्त पशुसंवर्धन

महाराष्ट्र राज्य पुणे ४११००७

www.ahd.maharashtra.gov.in

## प्राणी क्लेश प्रतिबंधक कायदा १९६०

प्राणी क्लेश प्रतिबंधक कायदा राज्यात १९६० पासून लागू करण्यात आला आहे. या कायदयातील "कलम ३" अन्वये कोणत्याही प्राण्यांचे पालकत्व धारण करणाऱ्या व्यक्तीने त्या प्राण्याची सर्वतोपरी काळजी घेण्याबाबत उपाययोजना करणे व त्यांना अनावश्यक वेदना अथवा त्रास होणार नाही याची दक्षता घेणे बंधनकारक आहे.

**कायद्याचे कलम ११ (१) अन्वये खालील बाबी प्रतिबंधीत केल्या आहेत.**

१) प्राण्यांना चाबकाने, काठीने अथवा कोणत्याही प्रकारे माराहाण करणे त्यांचेवर होणाऱ्या वेदनेस करणीभूत असणे.

२) आजारी, जखमी किंवा वेदनाग्रस्त प्राण्यांना कामाला जुंपणे अथवा जुंपण्यास परवानगी देणे.

३) प्राण्यांना जाणुनबुजून व विनाकारण अनावश्यक हानीकारक औषधी किंवा वस्तु खाऊ घालणे अथवा खाऊ घालण्यास कारणीभूत असणे.

४) अनावश्यक अथवा वेदनादायी पद्धतीने प्राण्यांना हाताळणे किंवा वाहनातून घेवून जाणे.

५) प्राण्यांना मर्यादित जागेत अथवा ज्या ठिकाणी जेथे त्यांना हालचाल करता येणार नाही अशा ठिकाणी अथवा पिंजऱ्यामध्ये कोंडून ठेवणे.

६) विनाकारण जास्तवेळ प्राण्यांना साखळीने बांधुन ठेवणे आखुड साखळीचा / दोरीचा अथवा वजनदार साखळीचा प्राण्यांना बांधुन ठेवण्यासाठी वापर करणे.

७) श्वानाचे पालक म्हणून त्यांनी श्वानांना विनाकरण साखळीने बांधून ठेवणे व त्यांचे व्यायामाकडे दुर्लक्ष करणे.

८) प्राण्यांच्या पालकांनी त्यांना पुरेसे अन्न, पाणी व निवारा न देणे.

९) सबळ कारण नसताना प्राण्याच्या पालकत्वाचा त्याग करणे व त्यायोगे प्राण्यांचे उपासमारीस कारणीभुत ठरणे.

१०) जाणूनबुजून प्राण्यांना रस्त्यावर मोकळे सोडून त्यांना संसर्गजन्य आजारास सामोरे जाण्यास कारणीभूत असणे अथवा अशा प्रकाराने अपघाताने त्यांच्या मृत्युस / अपंगत्वास कारणीभूत असणे.

११) कोणत्याही कारणास्तव स्वतःचे ताब्यातील, कोणत्याही भुकेल्या तहानलेल्या, दाटीवाटीने कोंबलेल्या किंवा इतर कोणत्याही कारणांनी व्यथीत असलेल्या प्राण्यांची विक्री करणे.

**महाराष्ट्र शासनाने गाय, गायीची वासरे, वळू किंवा बैल या गोवंशीय प्राण्यांचे रक्षणासाठी व उत्पादक म्हशी तसेच रेडे यांचे कत्तलीस निर्बंध घालण्यासाठी महाराष्ट्र प्राणी रक्षण (सुधारणा) अधिनियम १९९५ दि. ४ मार्च २०१५ पासून राज्यात लागू केला आहे. त्यानुसार खालील प्राण्यांच्या कत्तलीस व कत्तल करण्यासाठी वाहतूक करण्यास कायदेशीर प्रतिबंध आहे.**

**गाय किंवा गायीची वासरे**





**बैल किंवा वळू**





**उत्पादक म्हशी किंवा ३ महीन्या पर्यंतच्या वयाची पारडे**





**रेडे किंवा संकरीत गायी**





१२) स्ट्रीकनीन हे इंजेक्शन प्राण्यांच्या हृदयामध्ये टोचून अथवा इतर अनावश्यक क्रुर पद्धतीने प्राण्यांना ठार मारण्यासाठी बंदी (रस्त्यावरील श्वानांसह), तसेच जादा दुध उत्पादनासाठी ऑक्सिटोसीनचे इंजेक्शन देण्यास बंदी.

१३) मनोरंजनाचे कार्यक्रमासाठी प्राण्यांचा वापर करणे.

१४) प्राण्यांचा जुगारासाठी, झुंजी लावणेसाठी वापर करणे अथवा जागेच्या वापरास परवानगी देणे

१५) कैद केलेल्या प्राण्यांचा निशाणेबाजी अथवा तत्सम स्पर्धांसाठी वापर करणे.

# गोष्ट गुरांमधल्या विषबाधेची!






**डॉ. सुनील देशपांडे**
पविअ (वर्ग-१), पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१
कुडाळ, ता. जावळी, जि.सातारा.
मो.क्र.९४२३८६५४५८

**रखमा:** आक्कासाब, ओ, अक्कासाब, घरीच निघालासा नव्हं? या की!

**अक्कासाहेब:** अं.. रखमा.... आले गं. आले!

**रखमा:** कुठं भायेर गावी गेलता, अक्कासाब?

**अक्कासाहेब:** अंग हो, आपल्या तालुक्याच्या त्या मावळतीच्या गावात गेले होते. तिकडे माझी एक चुलतबहिण राहते, माहितीय ना तुला? अगं, त्यांच्याकडे दोन चांगल्या दुभत्या गायी होत्या.

**रखमा:** बरं मग? त्यांचं काय?

**अक्कासाहेब**: म्हणजे तशा साध्याच होत्या. जास्त टक्केवारी नव्हती. पण दूध बऱ्यापैकी द्यायच्या.

**रखमा**: मग काय झालं अक्कासाब त्यास्नी?

**अक्कासाहेब:** अगं रखमा, तुला तर माहितीय तिकडं कसंय ते?

**रखमा:** कसं वो अक्कासाब?

**अक्कासाहेब:** अगंsss सूर्य डोक्यावर येण्याच्या आधी गुरं डोंगरात चरायला सोडून द्यायची आणि सूर्य मावळतीला गेल्यावर ती दावणीला येणार.... आणि मग सकाळ-संध्याकाळ दूध मात्र मालकाने काढायचं बघ! दिवसभर त्या जनावरांनी काय खाल्लंय, किती खाल्लंय याचा पत्ताच नसतो. काही काही लोक तर काही महिन्यांसाठी जनावर डोंगरावर सोडून देतात, तिथंच ती गाभण राहतात. मग काही महिन्यानी दुभत्यासाठी मालकानी घरी आणायची. दूध कमी झालं की पुन्हा तेच. डोंगरात घालवून देणे....!

**रखमा:** हंऽऽ. अक्कासाब, आक्शी खर हाय तुमचं म्हननं, पर..अक्कासाब, तिकडं डोंगराळ भागात वैरण-काडी आपल्या पाणीदार भागापेक्षा कमी असतीया... मग जित्राब जगवायची म्हणून बापडी माणसं असं करतात बगा. अवो! शेवटी प्रत्येक जित्राबांवर त्यच्या मालकाचा जीव असतूयाच बगा. पण वैरणीपायी देत्यात सोडून डोंगरात. पर... तुमच्या चुलत बहिणीच्या गायींचं काय म्हणत होतासा?

**अक्कासाहेब:** अगं, तेच तर सांगत होते. आमच्या बहिणाबाईनी दोन्ही गायी चरायला डोंगरात सोडल्या. त्या चरुन संध्याकाळी परत येतानाच वाटेतच पडल्या अन् गेल्या दोन्हीपण.

**रखमा:** आरं देवा! काय सांगतासा काय अक्कासाब? अवो, म्हंजी लईच नुकसानी झाली म्हणायची! काय झालतं काय त्यास्नी?

**अक्कासाहेब:** अगं, डॉक्टरांनी सांगितलं, चरताना विषबाधा झाली आहे चराऊ अन्नातून आणि ती विषबाधा एवढी जास्त होती की उपचाराला डॉक्टर यायच्या आतच - सारा खेळ खल्लास!

**साहेब**: हम्मम... येऊ का घरात? काय अक्कासाहेब, कुणाला चराऊ अन्नातून विषबाधा झालीये?

**अक्कासाहेब**: अहो! या साहेब या ! अहो, माझ्या चुलतबहिणीच्या दोन गायी चरताना काहीबाही विषारी पदार्थ पोटात जाऊन त्वरित मृत्यू झाला त्यांचा. डोंगरात सोडलेल्या चरायला....काहीतरी गवताची विषबाधा झाली....

**साहेब:** अक्कासाहेब, अरे, अरे! म्हणजे बरेच नुकसान झाले म्हणायचे की मग!

**अक्कासाहेब:** हो ना साहेब!

रखमा: पर, साहेब, मला एक सांगा. अहो, ही ईषबाधा म्हंजी नक्की काय होतंय काय जित्राबास्नी?

**साहेब:** बरं का रखमाताई. ज्या पदार्थाच्या संपर्कात आल्याने किंवा तो खाल्ल्यामुळे जनावराची तब्येत बिघडते उदाहरणार्थ, दूषीत पाणी पिल्ल्यामुळे, किटकनाशक फवारलेल्या शेतातील पिक खाण्यात आल्यामुळे तसेच ज्या भागात चाऱ्याचा दुष्काळ असतो त्या भागातल्या गावरानातली विषारी वनस्पती खाल्ल्यामुळे जेंव्हा जनावरे आजारी होतात आणि दगावतात; अशा विषारी पदार्थामुळे स्वास्थ्य बिघडण्याच्या प्रक्रियेला विषबाधा म्हणतात.

**अक्कासाहेब:** साहेब, विषबाधा बऱ्याच वेळा अपघाताने होते पण काही वेळा काही समाजकंटक वाईट हेतूने सुध्दा विषबाधा घडवून आणतात. बरोबर आहे की नाही?

रखमा: खरं हाय! लयी बारी असं घडल्याचं - म्हणजी कधी या गावात तर कधी त्या गावात... असलं ऐकायला मिळतंय बगा. अन् मग लयी वाईट वाटतं बगा. आवं, शेवटी मुकी जितराबं बगा ती... त्यांनी काय वो कुणाचं वाईट केलेलं असतयां?

**अक्कासाहेब:** खरंय रखमा. वाईट तर वाटणारच.

**साहेब:** हम्म. पण सर्वात महत्त्वाचे विषबाधेचे कारण म्हणजे मालकाचा निष्काळजीपणा हेच असते, बरे का. त्यानंतर इतर कारणं म्हणजे किटकनाशक औषधांचा अयोग्य वापर, विषारी वनस्पतींचे सेवन, रासायनिक खतांचा अयोग्य वापर, औद्योगिक प्रदूषणामुळे होणारे दुष्परिणाम, विषारी प्राण्यांच्या किंवा कीटकांच्या चाव्याने होणारी विषबाधा! मघाशी आपण म्हणलो तशी मुद्दामहून घडवून आणलेली विषबाधा, कुजलेल्या, खराब किंवा नासक्या खाद्यांच्या खाण्यामुळे आणि किरणोत्सर्गामुळे अशा अनेक कारणांनी जनावरांना विषबाधा होते.

**अक्कासाहेब:** अगदी बरोबर साहेब. कितीतरी कारणं.... पण परिणाम एकच जनावरांचं मरणं!

**रखमा:** अक्कासाहेब, मग काय तुमच्या बहिणीच्या घरच्या जित्राबांना खाण्यातून ईषबाधा झाली व्हयं?

**अक्कासाहेब:** हो न गं रखमा.

**साहेब:** सर्वसाधारणपणे हिरव्या चाऱ्याची टंचाई असली की त्या काळात वनस्पतींमधून किंवा पशुखाद्यातून विषबाधा होऊ शकते. जसे की हिवराच्या शेंगा, बांबूचे फुटवे, हायब्रीड ज्वारीचे कोंबटे, कोवळा पाला, जवसाची रोपटे, वाढ खुंटलेले हिरवे धांडे, इतर पाला, या सर्व वनस्पतीत सायनाईड नावाचे आम्ल उर्फ विष असू शकते. त्याच्या सेवनामुळे जनावरात विषबाधा होते. काही वेळेला 'किरळ ' लागलं म्हणतात बघा. ऐकलाय ना हा शब्द तुम्ही?

**रखमा:** व्हय व्हय. 'किराळ' लागतंया जनावरांना सायेब. म्हनजे ज्वारी तुऱ्यात आली नसली आणि अशी ओली कोवळी ज्वारी जित्राबांनी खुरटली की त्यास्नी 'किराळ' लागतंया!

**अक्कासाहेब:** हं. रखमा, असंही असतं की एक वेळ काढून झाल्यावर ज्वारी पुन्हा फुटते. ते कोंब खाल्ल्यावर पण किराळ लागतंय-म्हणजेच विषबाधा होते!

**साहेब:** हं...तुम्हा दोघींचं अगदी बरोबर आहे!

**रखमा:** अब व्हयं की सायेब. आवं ss आपल्याकडं सारखं पोरीच्या जातीला आई-बाप जसं सांगत असत्याती न्हवं- अगं, हिकडं जायचं न्हाय, तिकडं जायचं न्हाय. सातच्या आत घरात यायचं. तसं जित्राबाच्या बाबतीत पण सांगत्याती - जनावरं हिकडं न्हेऊ नका, तिकडं न्हेऊ नका. घरातली थोर वडिल सांगत्यातीच की माहित हाये तेवढं!

**अक्कासाहेब:** हं. बरोबर आहे तुझं. पण रखमा, आपल्याकडे पोरांच्या जातींवर अशी बंधनं ठेवत नाहीत थोरलोक बऱ्याचदा!


**रखमा:** आव. अक्कासाब. ह्योच तर मोठा विषय हाये. पण अक्कासाब, जनावरांनी असं नियम तोडलं तर हायेच की मग 'किरळ'!

**साहेब:** अरे, बापरे , अक्कासाहेब एकदम स्त्रीस्वातंत्र्यावर येऊन पोचल्या की!

**रखमा:** आवं. सायब. आवं, आता नवीन ग्रामपंचायतीमधी महिला राज आलंय. पहिल्या ग्रामसभेत आपल्या अक्कासाहेबांनी जोशात भाषण केलं एकदम.

**साहेब:** अरे, वा! छान हं, अक्कासाहेब! छान! छान! घरदाराची आजवर घडी बसवणाऱ्या महिला गावाची घडीही तशीच काटेकोरपणे, काटकसरीने आणि तळमळीने बसवणार हे नक्की!

**रखमा:** व्हयं सायेब. परं सायेब, स्वारी बरं का! तुमी आपली चांगली माहिती सांगत हुता आन् म्याच इषय बदलला. सांगा बरं सायेब, किराळ लागल्यावर नेमकं काय काय हुतया जित्राबास्नी? जगत नाहीत नव्हं ही जित्राबं?


छायाचित्र स्रोत: इंटरनेट

**साहेब:** काही वनस्पतींमध्ये किंवा मघाशी म्हटल्याप्रमाणे ज्वारीच्या कोवळ्या फुटव्यामधे प्रूसिक ॲसीड असते. सायनाईड असते. या विषबाधेने जनावराच्या धडाची बाजू निकामी होते. जनावरांना आकडी येते. श्वासोच्छवास जलद होतो. तोंडाला फेस येतो, पोट फुगते, थरथर कापून जनावरं तडकाफडकी दगावू शकतात. पण महत्त्वाचा मुद्दा म्हणजे या विषारी घटकांची किती मात्रा पोटात गेली यावर पुढची लक्षणं अवलंबून असतात. बऱ्याचदा हे इतके जलद घडतं की इलाज करायला वेळच मिळत नाही.

**रखमा:** अरे बाप रे! म्हंजी लयीच जालिम इष हाये म्हणायचं की हे!

**साहेब:** हे, रखमाताई. अगदी बरोबर. आणि...आणखीही काही वनस्पती आहेत बरं का!

**रखमा:** कोणत्या वो सायेब?

**साहेब:** 'बचनाग ' नावाची एक वनस्पती - इंग्रजीत याला अको बाईट असं नाव आहे. नदीकिनारी ही वनस्पती आढळते. या वनस्पतीची मुळे गाजरासारखी असतात आणि ती गुच्छागुच्छाने असतात. ही मुळे सुरुवातीला खाण्यास कडू लागतात. पण लगेच जनावरांच्या तोंडाची चव जाऊन जनावरे ती मुळे भरपूर खातात आणि विष चढतं ताबडतोब. मग अशी जनावरं सुन्न उभी राहतात. एकेक अवयव निकामी होतो. मागची बाजू, मग छाती, श्वास आणि हृदय बंद पडून जनावर दगावतं. त्यामुळे जनावर नदीकाठी, ओढ्याकाळी चारताना त्याच्यावर लक्ष ठेवून धोका टाळणे हाच खरा उपाय.

**अक्कासाहेब:** साहेब, सुबाभूळीविषयी पण ऐकलं होतं. सुबाभूळ खरं तर चांगलं खाद्य आहे ना?

**साहेब:** होय, अक्कासाहेब. सुबाभूळ ही तशी खूप पौष्टिक. पण त्याच्या कोवळ्या पानांमधे 'मायमोसिन' या घातक द्रव्याचे प्रमाण अधिक असतं आणि अशी कोवळी पानं खूप जास्त खाल्ली की विषबाधा होते. पाने जशी जशी जूनी होतील, तसे हे द्रव्य या पानातून निघून जाते आणि विषबाधेचा काहीही धोका राहत नाही.

**अक्कासाहेब:** हां. म्हणजे अपरिपक्व "कोवळी ज्वारी" धोकादायक पण "तयार ज्वारी" जशी एकदम पौष्टिक असते, तसेच ना साहेब!

**साहेब:** अगदी बरोबर अक्कासाहेब! अगदी तसंच!

**रखमा:** सायेब, तुमी उसाच्या वाढ्याविषयी नेहमी सांगता - घालू नका जनावरांना.

**साहेब:** बरोबर आहे, रखमाताई. अहो, उसाचे वाढे विशेषतः कुशीचे वाढे आणि बुरशीयुक्त, भिजलेला किंवा टोकांना काळा पडलेला कडबा या सगळ्यांमधे ऑक्झॉलिक ॲसिड नावाच्या आम्लाचं प्रमाण अधिक असते. हे आम्ल जनावराच्या शरीरातलं कॅल्शीयम शोषून घेते आणि शेण-लघवीवाटे ते बाहेर पडल्याने शरीरातली कॅल्शीयमची पातळी घसरते आणि मग दूधाला आपली गाय- म्हैस एकदम कमी पडली की आपण एकदम जागे होतो.





छायाचित्र स्रोत: इंटरनेट

**रखमा:** बरोबर, सायेब. आवं दूध कमी झालं की कळतया लगीच आणि नुकसान बी होतया न्हवं. मग?

**अक्कासाहेब:** अगं, रखमा, पण जनावरांचं पण नुकसान होतंच की. जनावरांचं वोट फुगतं, ते चारा खात नाहीत, लघवीला त्रास होतो, बसलेले जनावर कित्येकदा लवकर उठतच नाही. त्याच्या शरीरातलं कॅल्शीयम आणि ताकदच संपून जाते बघ. बरोबर ना साहेब?

**साहेब:** खरंय अक्कासाहेब. म्हणूनच मी नेहमी सांगत असतो कुस असणारे ऊसाचे वाढे देऊ नका, बुरसटलेला कडबा देऊ नका म्हणून.

**रखमा:** व्हय सायेब. हे सांगीतलेले तुम्ही लयदा!

**साहेब:** हम्म. आणि हो, आता हे बघा. गाजर गवत. गाजर गवत जनावराच्या खाण्यात आलं तर त्याला पचनाचे विकार होतात, यकृतात दोष निर्माण होतात. कातडीचे रोग आणि रक्तक्षय असे विकार होऊ शकतात.

**रखमा:** आणि साहेब, धोतऱ्याचं कसं काय?

**साहेब:** पिवळ्या धोतऱ्याच्या बिया जनावरांच्या खाण्यात चुकून आल्या; तर जनावरांना जलोदर, अतिसार होतो. गुरे डोळे विस्फारून पाहतात. किंवा डोळे गरागरा फिरवतात. रुईच्या पानाच्या रसामुळे आतड्यांवर सूज येते. अतीसार होतो. हगवण लागते.

**अक्कासाहेब:** बाप रे. बरेच सावध राहायला हवे, साहेब!

**साहेब:** निश्चितच. ज्वारीवर येणारी अरगट किंवा गोसावी खाण्यात आल्यास लहान जनावरांच्या पायाची, कानाची आणि शेपटीची टोके झडतात. अशा प्रकारची ज्वारी मिठाच्या द्रावणात धुवून नंतरच तिचा वापर जनावरांच्या खाण्यासाठी करावा.

**अक्कासाहेब:** अजून काय काळजी घ्यायची, साहेब?

**साहेब:** महाराष्ट्राच्या पश्चिम भागात कोकण आणि देशाला जोडणाऱ्या भागात, सह्याद्रीतील आणि इतर अनेक डोंगराळ ठिकाणी क्षारांच्या कमतरतेने जनावरे कुजलेली हाडे, पाने चघळतात आणि "हळवा " नावाचा जीवघेणा रोग होतो. जर एखाद्या जनावराच्या खाण्यात लाखेची डाळ आल्यास पायांना, स्नायूंना दुबळेपणा येतो. कधी कधी लकवा मारतो. एरंडीच्या टरफलांमुळे जनावरांना रक्ती हगवण होते!

**रखमा:** बाई, बाई, बाई. अवो, सायेब. म्हणजे हे सगळे लईच डेंजर दिसतंया! अगदी "हिकडं आड आन् तिकडं हीर" असल्यागत! काय चारायचं काय आम्ही गुरास्नी मग?

**साहेब:** अहो रखमाताई, गुरांना त्यांचं त्यांचं पौष्टीक खादय, वैरणी, मुरघास, चारा, पेंड, खनिज मिश्रणं असं सगळं द्यायचं!

**अक्कासाहेब:** साहेब, आपल्याकडूनच अनेकदा चुका होतात आणि बिचारी जनावरं त्याचा त्रास भोगतात. खरंय की नाही?

**साहेब:** बरोबर आहे, आक्कासाहेब. त्याला आपल्या वेगवेगळ्या समजूती आणि गैरसमजूतीच कारणीभूत असतात. आता हेच बघा ना. एखादं औषध प्रमाणाच्यापेक्षा जास्त दिलं, किंवा शरीरातून योग्य निचरा न होणारं औषध बराच काळ दिलं किंवा गोचीड, गोमाशांसाठी वाट्टेल ती किटकनाशके वाट्टेल त्या प्रमाणात जनावराना अंगावर लावली की मग गंभीर विषबाधा होऊ शकते. जंतावरच्या औषधांचे डोस जास्त झाले तरी बिचाऱ्या, जनावराला त्रास होतो. उंदराची औषधं, रंगांचे डबे, तणनाशक चुकून चाटली तर विषबाधा होते. अशा गोष्टी गोठ्यात ठेवू नयेत.

**अक्कासाहेब:** अगदी खरंय तुमचं साहेब. अहो, काही शेतकरी तंबाखूचा काढा अनावरात्त जत झाल्यावर द्यायचे. पण याचे प्रमाण जास्त झालं किंवा काढा कार कडक झाला की विषबाधा व्हायची..!

**साहेब:** अहो, त्यापेक्षा जंतांची औषधं नविन जी मिळतात, ती सुरक्षीत असतात. जनावरांच्या सरकारी दवाखान्यातूनही ती उपलब्ध असतात. मग तीच वापरलेली बरी. गाभणकाळात चालणारी औषधंसुद्धा आपल्या दवाखान्यांमध्ये असतात. **रखमा:** अहो, व्हय तर सायेब. अहो, तुमच्यासारखे, सरकारी दवाखान्यातले डाक्टरसायेब लय चांगलं हायेत म्हणून आमची जित्राबं खुश हायेत बगा. तुम्ही नेहमी सांगता की, जंतावरचं औषध घ्या, टॉनिक पावडर न्या, जनावरांची काळजी घ्या, लशी टोचून घ्या. तुमचं समदं चांगलं चाललंय! पण आमीच कमी पडतूया बगा!

**अक्कासाहेब:** हम्म. खरंय रखमा. आता काय करतोय आपण. बरं. साहेब, पूर्वी 'सोमल' पाजायचे बघा जनावरांना? त्यानी पण कधी कधी त्रास व्हायचा ना?

**साहेब:** हो. त्याला इंग्रजीत "आर्सेनिक" म्हणतात. हे द्रव्य खूप उपयुक्त आहे पण प्रमाणात दिले तर! नाही तर हे द्रव्य कोठ्यात साठते. त्यामुळे ते सहा-सात दिवसांपेक्षा जास्त दिवस देणे चांगलं नाही.

**अक्कासाहेब:** आणि साहेब, "कडू कुचला"?

**साहेब:** कडू कुचल्याला इंग्रजीत "नक्स व्होमिका" म्हणतात. जनावरांची प्रकृती सुधारण्यास याची मदत होते. पण प्रमाण चुकलं, जास्त झाले की विषबाधा होते. म्हणजे, एकूण काय तर "प्रमाणामध्ये सारे काही असावे" हा मंत्र शेतकऱ्याने लक्षात ठेवला पाहिजे.

**अक्कासाहेब:** अगदी लाख बोललात साहेब. पण काही वेळा जनावरांना होणाऱ्या विषबाधा या आपल्या कह्यापलीकडच्या असत्यात. जसे की साप, विंचू, कोळी, किडा, कातीन, गोम, इंगळी, भुंगा, गांधीलमाशी, मोहाच्या माशी, विंचू इत्यादींच्या दंशामुळे विषबाधा होऊ शकते.

**साहेब:** बरोबर. अशा वेळी कुठलेही अघोरी उपाय न करता ताबडतोब पशुवैद्यक डॉक्टरांना बोलवून उपचार करुन घ्यायला पाहिजेत. महाराष्ट्र शासनाचे पशुवैद्यकीय दवाखाने सर्वत्र आहेत. शिवाय फिरते दवाखाने आहेत. त्यांचा फायदा घ्यायचा आणि आपल्या जनावराचे अमूल्य प्राण वाचवायचे!

**अक्कासाहेब, रखमा आणि साहेब** एका सुरात **"काळजी करायची नाही, काळजी घ्यायची!"**

